



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राज्यभरात शिवजयंतीचा उत्साह
## शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळा

### पारंपरिक पाळणा गात शिवरायांना अभिवादन,मुख्यमंत्री-दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून मानवंदना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९पुणे**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज ३९६ वी जयंती राज्यभरात अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावात साजरी होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर पहाटेपासूनच शिवभक्तांची मांदियाळी जमली असून 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला आहे.



शिवनेरीवरील मुख्य शासकीय सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दाखल झाले आहेत. त्यांच्यासोबतच पर्यटनमंत्री शंभुराज देसाई, सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार आणि इतर अनेक मान्यवर महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवनेरीवर पोहोचले आहेत.

शिवजयंतीचे औचित्य साधून किल्ले शिवनेरीवर आणि विशेषतः शिवजन्म स्थळाच्या आतील भागात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. गडाला ऐतिहासिक वारसा जपून विद्युत रोषणाईने उजळवून टाकण्यात आले आहे. या मंगलमयी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी आणि जन्मस्थळावर नतमस्तक होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवभक्त गडावर दाखल झाले आहेत.

## बिहार विधानसभेचे अध्यक्षांसह ४२ आमदारांना उच्च न्यायालयाची नोटीस

### निवडणूक प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ पटना**

बिहारच्या राजकारणात मोठी कायदेशीर घडामोड समोर आली आहे. पाटणा हाय कोर्ट ने सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील ४२ आमदारांना नोटीस बजावली आहे. यामध्ये विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांचाही समावेश आहे.

न्यायालयाने निवडणूक प्रतिज्ञापत्रात कथित चुकीची माहिती व अनियमितता केल्याच्या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. प्रकरण गंभीर मानून ठराविक कालावधीत उत्तर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.




माहितीनुसार संबंधित मतदारसंघांतील पराभूत उमेदवारांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्यांचा आरोप आहे की विजयी उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना प्रतिज्ञापत्रात काही महत्त्वाची तथ्ये लपवली.काही प्रकरणांत मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या आरोपांच्या आधारे उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आल्या.

प्राथमिक सुनावणीनंतर न्यायालयाने सर्व संबंधित आमदारांना नोटीस जारी केली आहे. आता सादर होणाऱ्या उत्तर व कागदपत्रांच्या आधारे पुढील सुनावणी होणार आहे.

नोटीस मिळालेल्यांमध्ये ऊर्जा मंत्री बिजेंद्र यादव यांचे नावही समाविष्ट आहे. माजी मंत्री जिवेश मिश्रा आणि आमदार चेतन आनंद यांनाही उत्तर द्यावे लागणार आहे. गोह मतदारसंघातील आमदार अमेंद्र प्रसाद यांचाही यादीत समावेश आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, नोटीस मिळालेल्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील आमदारांचा समावेश आहे. त्यामुळे हे प्रकरण पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन कायदेशीर चौकटीत हाताळले जात असल्याचे स्पष्ट होते. पुढील सुनावणीत न्यायालय या सर्वांच्या उत्तरांवर विचार करणार आहे.उच्च न्यायालयाची ही कारवाई निवडणूक पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. आरोप सिद्ध झाल्यास संबंधित आमदारांच्या सदस्यत्वावर परिणाम होऊ शकतो. मात्र सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट असून अंतिम निर्णय येणे बाकी आहे.

आमदारांना आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी देण्यात आली आहे. या घडामोडीमुळे विधानसभेच्या आत व बाहेर राजकीय प्रतिक्रिया तीव्र होण्याची शक्यता आहे. आता सर्वांचे लक्ष पुढील सुनावणी आणि न्यायालयाच्या भूमिकेकडे लागले आहे.

## अजितदादांची किल्ल्यांबाबतची ती इच्छा पूर्ण
## मुख्यमंत्री फडणवीसांची शिवनेरीवरून घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९पुणे**

रयतेचा राजा हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीचा आज राज्यासह देशभरात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवरायांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर विशेष शासकिय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री आशिष शेलार, अभिनेता रितेश देशमुख उपस्थित होते. शासकीय कार्यक्रम झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. यावेळी त्यांनी शिवजयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच, या भाषणात त्यांनी अजित पवारांनी मागील वर्षी केलेली किल्ल्यांच्या संदर्भातील इच्छा पूर्ण झाली असल्याची घोषणा केली.




शिवनेरी किल्ल्यावर केलेल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज नसते, तर भारताचा जो इतिहास पाहतोय, जो भूगोल आपण अनुभवतोय, ते काहीच नसते. खऱ्या अर्थाने ज्या काळात हिंदुस्थानात अनेक राजे आणि राजवाडे मोघलांचे मंडलिकत्व स्वीकारून काम करत होते, अशा परिस्थितीत आई जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना घडवले. हे घडवताना त्यांना सांगितले की, तुम्हाला हिंदुस्थानाला मोघलांच्या जोखडातून मुक्त करायचे आहे आणि रयतेचे राज्य स्थापित करायचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून एक फौज तयार केली. त्या फौजेने खऱ्या स्वराज्याची स्थापना केली आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगितले की, हे माझे राज्य नाही तर रयतेचे राज्य आहे. तुम्ही जे लढत आहात, ते मला राजा बनवण्यासाठी लढत नाही. तुम्ही जे लढत आहात ते देव, देश आणि धर्माकरिता लढत आहात, असे फडणवीसांनी म्हटले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांनी नेमकी कोणती इच्छा व्यक्त केली होती? जी आता पूर्ण झाली आहे. याबाबत भाष्य केले. यावेळी ते म्हणाले की, अजितदादांचे शिवनेरीवर प्रचंड प्रेम होते, मागच्या काळात आम्ही घोषणा केली होती की, महाराष्ट्रातील शिवरायांचे सर्व किल्ले आम्ही अतिक्रमणमुक्त करू. मला सांगताना आनंद वाटतोय की अजित दादांच्या इच्छेनुसार पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले आता अतिक्रमणमुक्त झाले आहेत. एकाही किल्ल्यावर आता अतिक्रमण नाही, अशी घोषणा यावेळी फडणवीसांकडून करण्यात आली. तसेच २०३० ला ४०० वी शिवजयंती आपण भव्य दिव्य स्वरूपात साजरी करू, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून सांगण्यात आले.

## शिवनेरी किल्ल्यावर चेंगराचेंगरीसदृश घटना
## महिला- मुलांसह अनेक जण जखमी, परिस्थिती नियंत्रणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९पुणे**

पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीनिमित्त जमलेल्या प्रचंड गर्दीमुळे चेंगराचेंगरीसदृश स्थिती निर्माण झाली. या घटनेत महिला आणि लहान मुलांसह अनेकजण जखमी झाले. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून शिवभक्तांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त किल्ल्यावर दर्शन, पूजा आणि विविध कार्यक्रमांसाठी हजारो शिवभक्त पहाटेपासूनच दाखल झाले होते.



रात्रीपासूनच शिवज्योत घेऊन येणारे कार्यकर्ते, विविध संघटनांचे सदस्य आणि भाविक किल्ल्यावर जमा होऊ लागले होते. सकाळ होताच गर्दीचा ओघ वाढला. 'पुढारी न्यूज'च्या वृत्तानुसार किल्ल्याच्या अरुंद पायऱ्या, हत्ती दरवाजा आणि अंबरखान्याखालील गणेश दरवाजा या मार्गांवर एकाच वेळी मोठ्या संख्येने लोक आल्याने परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली.

काही लोक रांग सोडून किल्ल्याच्या जीर्ण भिंतींवरून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत होते. याच गोंधळात अचानक गर्दीचा जोर वाढला आणि काही लोक घसरले. त्यानंतर काही क्षणांतच चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाली. शिवज्योत आणि भगवे झेंडे घेऊन आलेले लोक एकमेकांवर आदळू लागल्याने अनेकांना श्वास घ्यायलाही त्रास झाला.

अतिरिक्त पोलीस आणि आपत्कालीन सेवा तातडीने किल्ल्यावर दाखल करण्यात आल्या. जखमींना त्वरित जुन्नर येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. डॉक्टरांच्या माहितीनुसार बहुतेक जखमींना किरकोळ दुखापती झाली असून काहींना दम लागणे, चक्कर येणे आणि हात-पायाला मार लागला आहे. सर्वांवर उपचार सुरू असून बहुतांश जखमींची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

दरम्यान, प्रशासनाने किल्ल्यावर प्रवेशासाठी मर्यादा घालण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काही तास एकाच वेळी ठरावीक संख्येतील भाविकांनाच प्रवेश देण्यात येणार असून प्रवेश आणि निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग ठेवण्यात आले आहेत. गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन आणि सीसीटीव्हीचा वापर करण्यात येत आहे.या घटनेमुळे शिवजयंतीसारख्या मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांसाठी आधीच अधिक काटेकोर नियोजनाची गरज असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. ऐतिहासिक वास्तूंमध्ये वाढती गर्दी, अपुरा बंदोबस्त आणि समन्वयाचा अभाव यामुळे अशा दुर्घटना घडण्याचा धोका असतो. सुदैवाने या वेळी मोठी जीवितहानी झाली नाही, मात्र अनेक भाविकांना दुखापतींना सामोरे जावे लागले. प्रशासनाने नागरिकांना संयम राखण्याचे आणि सुरक्षिततेच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## कठीण प्रसंगात शपथ घेताना माझ्या डोळ्यासमोर

### किल्ले शिवनेरीवर सुनेत्रा पवारांचं भावूक भाषण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९पुणे**

शिवनेरी किल्ला हे अजितदादांसाठी फक्त ऐतिहासिक स्थळ नव्हते तर त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थळ होते. आज ज्याठिकाणी उभी राहून मी भाषण करतेय त्याच ठिकाणी दादांनी अनेकवेळा छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करताना पाहिले आहे. स्वराज्य संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र शिवभूमीवर मला उपस्थित राहण्याचं भाग्य लाभले. हा क्षण माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा, अभिमानाचा आणि तितकाच भावनिक आहे. यापूर्वीही अनेकवेळा शिवजन्मभूमीवर येण्याचे भाग्य मला लाभले होते. परंतु आजचा दिवस माझ्यासाठी वेगळा आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे असं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी म्हटलं. किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या कार्यक्रमात सुनेत्रा पवारांनी भावनिक भाषण केले.उपमुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्याच भाषणात सुनेत्रा पवार म्हणाल्या की, नुकतीच मी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ज्या कठीण प्रसंगात मी शपथ घेतली त्यावेळी माझ्या डोळ्यासमोर जिजाऊ माँसाहेब उभ्या होत्या. माँसाहेबांनी केवळ शिवरायांना जन्म दिला नाही तर स्वराज्याचा ध्यास दिला, संस्कार दिले आणि संकटाशी २ हात करण्याची प्रेरणा दिली. हाच आपला आधार आहे. या क्षणी माझ्या अंगावर काटा आला आहे. छत्रपती शिवरायांनी मावळ्यांना दिलेली स्वराज्याची शपथ आठवली. आपण सर्व छत्रपतींचे मावळे आहोत हीच भावना माझ्या मनात आहे. याच भूमीत स्वराज्याचा तेजस्वी सूर्य जन्माला आला आणि अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढण्याची प्रेरणा संपूर्ण महाराष्ट्राला दिली. शिवजयंती हा केवळ उत्सव नाही तर स्वराज्य, स्वाभिमान अन् सुशासनाचा संकल्प दृढ करण्याचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचं बळ आम्हाला मिळू दे असं साकडे शिवाईदेवीच्या चरणी घालते असं त्यांनी सांगितले.

## 'कुर्बानी देणार कोण? शरद पवार? उद्धव ठाकरे?

### राज्यसभा, विधान परिषदेच्या उमेदवारीवरून भाजपाचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आटोपल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला आता राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत. त्यात राज्यातील राज्यसभेच्या सात जागांसाठी बुधवारी निवडणूक जाहीर झाली असून, सध्याच्या गोळाबेरजेनुसार राज्यसभा आणि विधान परिषदेमध्ये केवळ प्रत्येकी एक जागा महाविकास आघाडीला मिळण्याची शक्यता आहे. तसेच या जागांसाठी महाविकास आघाडीमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. त्यावरून आता भाजपाने महाविकास आघाडीला टोला लगावला आहे. तसेच मैत्रीमध्ये कुर्बानी कौन देगा? असा सवाल भाजपाने विचारला आहे.

या संदर्भात सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आंखे चित्रपटातील उदाहरण देत लिहिलं की, गोविंदा आणि चंकी पांडे यांच्या



गाजलेल्या आंखें चित्रपटात कादर खान आणि सदाशिव अमरापूरकर यांच्यातला एक भन्नाट संवाद आहे. दोघे जिवलग मित्र, दोघेही बिंदूवर प्रेम करणारे असतात आणि पार्टीत बिंदूही दोघांकडे सारखंच लक्ष देते. तेव्हा सदाशिव अमरापूरकर म्हणतात की, एकाला कुर्बानी द्यावी लागेल. त्यानंतर कादर खान थेट सवाल विचारतात की, कुर्बानी देगा कौन? आज हा संवाद आठवण्याचं कारण म्हणजे आगामी राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुका हे होय.

या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी दोन्हीकडे एकच उमेदवार देऊ शकते. त्यात राज्यसभेसाठी शरद पवार पुन्हा जावेत, यासाठी संजय राऊत आग्रही आहेत. काँग्रेसने स्पष्ट अशी अट घातली आहे. राज्यसभेला पवारांना पाठिंबा दिला, तर विधानपरिषदेला उद्धव ठाकरे यांना पाठिंबा देणार नाही, असे काँग्रेसने स्पष्टपणे सांगितलं आहे. म्हणजेच समीकरण स्पष्ट आहे. त्यामुळे यात एकाची अडचण ठरलेलीच आहे. आता या दोघांच्या मैत्रीत कुर्बानी कोण देणार? शरद पवार? उद्धव ठाकरे? की दोघे मिळून काँग्रेसचाच बळी घेणार? असा खोचक सवाल केशव उपाध्ये यांनी विचारला आहे.

## राज्यसभेच्या ७ जागांसाठी रणधुमाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ मुंबई**

देशातील विविध राज्यांतील राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणूक आयोगाने बिगुल वाजवले आहे. एप्रिल २०२६ मध्ये कार्यकाळ संपणाऱ्या सदस्यांच्या जागी ही निवडणूक होणार असून, महाराष्ट्रातील सर्वाधिक ७ जागांसाठी मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने भाजपमध्ये पुन्हा एकदा 'निष्ठावंत विरुद्ध आयाराम' असा वाद उफाळून येण्याची चिन्हे आहेत.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर ६ मार्च रोजी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारांना माघार घेण्यासाठी ९ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मतदानाची प्रक्रिया १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार असून निकाल त्यानंतर जाहीर केले जातील.




## संपादकीय ......

# बसरूरची रोमांचक लढाई

*शिवरायांच्या अनेक साहसी मोहिमांपैकीच एक आरमारी मोहीम म्हणजे बसरूरची लढाई. या लढाईत शिवरायांची मुत्सद्देगिरी आणि त्याचबरोबर उच्च कोटीची नैतिकताही दिसून येते.*

*शिव छत्रपतींच्या अनेक साहसी, विलक्षण, रोमांचकारी लढायांपैकीच एक महत्त्वाची म्हणजे बसरूरची लढाई. राजांनी फेब्रुवारी १६६५ मध्ये स्वतःच्या नेतृत्वाखाली कर्नाटकातील बसरूर बंदरावर केलेली आरमारी मोहीम ही मराठा नौदलाच्या इतिहासातील पहिली आणि अत्यंत यशस्वी सागरी मोहीम होय. पोर्तुगीजांना चाप लावण्यासाठी, कारवारच्या दक्षिणेकडील या श्रीमंत बंदरावर अचानक हल्ला करून महाराजांनी प्रचंड संपत्ती लुटली व मराठ्यांचे आरमारी सामर्थ्य सिद्ध केलं. कर्नाटकातील उडुपी जिल्ह्यातील बसरूर येथील पोर्तुगीजांची सत्ता आणि त्यांनी केलेली लूट मोडून काढण्यासाठी ही मोहीम आखली गेली. या मोहिमेत महाराजांनी अफाट संपत्ती मिळवली आणि शत्रूला अनपेक्षित आजची संकल्पना वापरायची तर 'सर्जिकल स्ट्राईक'ने नामोहरम केलं. बसरूर बंदरावर पोर्तुगीजांनी अवैध कब्जा करून स्थानिक जनतेची लूट केली होती. तसेच, सुरतसारखं समृद्ध बंदर व्यापारासाठी महत्त्वाचं होतं. १६६४ मध्ये बेदनूरचा शासनकर्ता भद्राप्पा नाईक यांचा मृत्यू झाल्यामुळं अराजक मानले होतं. तेव्हा माजलेल्या पोर्तुगीजांचा बीमोड करणं आवश्यक होतं.मालवणच्या सागरी किल्ल्याची उभारणी सुरू होती. कर्नाटकातील भटकळच्या दक्षिणेस असलेल्या बसरूर बंदरावर चालून जाण्याचा मनसुबा मनी धरून शिवाजीराजांनी तयारी केली. तीन मोठी गलबतं, ८५ जहाजं आणि लहान तरांडी घेऊन राजांनी मोहीम सुरू केली. तलवारी, भाले, बरच्या अशा शस्त्रांसह पुरेसे तोफगोळे आणि तोफा घेऊन, बलदंड घोडे आदी युद्धसाहित्य गलबतांवर चढवण्यात आलं. छोट्या जहाजांवर सैनिकांना चढवण्यात आलं. दहा हजार सैन्य होतं. स्वारीची जय्यत तयारी करण्यात आली. सरदार दोरोजी फाकडे आणि मायनाक भंडारी हे जातीनं लक्ष घालून सैन्याची जुळणी करत होते.*


*शिवाजीराजांनी काटेकोर नियोजन केलं होतं. त्या काळात बार्देश गोवा या पोर्तुगीज ठाण्यावर सैन्य खूप कमी होतं. राजांनी अत्यंत धूर्तपणे ही मोहीम आखली होती. राजांच्या गुप्तहेरांनी आणलेली खबर पक्की होती. पोर्तुगालचा सम्राट चौथा जॉन याची कन्या लेडी कॅथरीन हिचा विवाह २१ मार्च १६६२ या दिवशी इंग्लंडच्या दुसरा चार्ल्स याच्याशी झाला होता. पोर्तुगीज सम्राटानं आपल्या ताब्यातील मुंबई हे महत्त्वाचं आणि समृद्ध बेट आपला जावई इंग्लंडचा राजपुत्र चार्ल्स द्वितीय याला आंदण म्हणून द्यायचं जाहीर केलं होतं. तो सोहळा ८ फेब्रुवारी १६६५ या दिवशी मुंबईत व्हायचा होता. त्यासाठी सारी पोर्तुगीज सेना गोव्यातून समुद्रमार्गे मुंबईला गेली होती. गोव्यात अगदी तुरळक सैन्य उरलं होतं. शिवाजीराजांनी वर्षभरापूर्वीच ही खबर काढली होती. म्हणूनच गोवा जिंकून पोर्तुगीजांच्या ताब्यातून सोडवायचा आणि गोव्यातील पोर्तुगीजांची सगळी ठाणी जिंकून त्यांना पोर्तुगालला हाकलण्याचा निर्धारच राजांनी केला होता.*

*शिवाजीराजांनी इशारा देताच ही आरमारी मोहीम सुरू झाली. जाताना एका बेटाजवळ राजांनी सारा ताफा थांबवला. जहाजावरून शंभर घोडी आणि स्वारांना बेटावर उतरवलं. स्वत: नेताजी पालकर आणि मुरारबाजी देशपांडे या कसलेल्या सेनानींना उतरवलं. फिरंग्यांच्या ठाण्यांवरची सगळी खबरबात काढून आणण्यासाठी हे सारेजण चपळ, तगडे घोडे दौडवत रवाना झाले. नेताजी आणि मुरारबाजींनी ठरवल्यानुसार दुसर्या दिवशी रात्री सारं घोडदळ दौडत परत आलं. नेताजींनी राजांना सांगितलं, 'राजे, उद्या पहाटेला पोर्तुगीजांच्या सर्व ठाण्यांवर भगवा फडकेल, इतकी त्यांची फौज कमी आहे. पण, त्यांचा बारुदखाना आणि दारूगोळा अफाट आहे. असंख्य तोफा आणि कसलेले गोलंदाज सज्ज आहेत. आपल्या सैन्याची प्रचंड हानी होईल. दहा हजारांपैकी दोनेक हजार सैनिक कसेबसे वाचतील. आठ हजारांना प्राणाहुती द्यावी लागेल.'*

*आपल्या मस्तकावर वीज कोसळते की काय असा आघात राजांवर झाला. ते म्हणाले, 'नेतोकाका, मी शिवाजी आहे, कुणी बादशहा नव्हे. माझ्या लाडक्या सैनिकांचा बळी देऊन तिन्ही लोकांचं सम्राटपदही मला नको. बादशहाचं सैन्य हे पगारासाठी लढतं आणि माझं सैन्य हे स्वराज्यप्राप्तीच्या ध्येयासाठी लढतं. म्हणून माझा प्रत्येक सैनिक मला प्राणाहून प्रिय आहे...' महाराजांनी आपला ताफा बार्देश गोव्याकडे नेण्याऐवजी इक्केरीकडे वळवला. अंकोला, होनावर, भटकळ या बाजूनं बसरूरच्या दिशेनं राजे पुढे निघाले. कारवार मागे पडलं. पुढे कुंदापूरचा किल्ला आणि त्याच्या बाजूला बसरूरचा जलदुर्ग उभा होता. शिवाजीराजे येत असल्याची वार्ता समजल्यानंतर त्या समृद्ध सुवर्णनगरांमधली प्रजा आनंदली. तिथला राजा सोमशेखर आपल्या प्रजेला भेटू शकत नव्हता, आपल्याच राज्यात फिरू शकत नव्हता. इक्केरीच्या प्रजेनं शिवरायांचं स्वागत केलं.*

*बसरूरच्या जवळून वाहणार्या वराही नदीतून फिरंग्यांचं एक जहाज पुढे चाललं होतं. इक्केरीमधील तरण्याबांड सुंदर स्त्रियांना बंदिवान करून फिरंगी दलालांनी पोर्तुगालला पळवून न्यायचा कट केला होता. तेच हे जहाज होतं. राजांनी तरांडी आणि छोट्या नावांमधून सशस्त्र सैनिकांच्या पलटणी सागरातून धाडल्या. सैनिकांनी फिरंगी जहाजाला वेढा घातला. 'हर हर महादेव' हा घोष करत मावळ्यांनी पोर्तुगीज दलालांना कंठस्नान घातलं. सर्व लेकीबाळींची सुटका केली. दुसर्या योजनेप्रमाणे मावळे तरांड्यांमधून बसरूरच्या भूमीवर उतरले. हलक्या तोफा नेण्यात आल्या. पहाट होण्यापूर्वीच पोर्तुगीज सैनिकांवर हल्ला चढवला. बेसावध सैनिकांना कैद केलं. जे लढले, त्यांना यमसदनी पाठवलं. कमी वेळेची, पण जोरदार लढाई झाली. शिवाजी राजांनी बसरूरच्या पोर्तुगीजांच्या ठाण्यावर कब्जा मिळवला. पोर्तुगीजांनी निरपराध प्रजेच्या गुलामगिरीसाठी बनवलेले लाकडी पिंजरे राजांनी मोडून काढून प्रजेची सुटका केली. बावीस वर्षे वयाचा राजा सोमशेखर आपल्या रूपसुंदर चेन्नम्मा राणीला घेऊन शिवरायांच्या दर्शनाला आला. राजांनी त्याचं राज्य त्याच्या हाती सोपवलं. त्याच्या संपत्तीपैकी एका कवडीलाही राजांनी हात लावला नाही. शिवरायांच्या मनोरंजनासाठी सोमशेखरनं कलावती नामक सौंदर्यवान कलावंतिणीचं नृत्य आयोजित केलं होतं. शिवरायांनी या नृत्यगायनाच्या सोहळ्याला उपस्थित राहायला ठामपणे नकार दिला. इतकेच नव्हे, तर सोमशेखर राजाच्या खांद्यावर हात ठेवून राजे म्हणाले, 'सोमशेखर, आपली राणी चेन्नम्मा या रूपवती आहेत, गुणवती आहेत. त्यांना नीट सांभाळा. रंगाढंगाच्या नादात किती वाहवत जायचं आणि आपल्या राजगादीचं पावित्र्य किती जपायचं, याचा गांभीर्यानं विचार करा.' पोर्तुगीजांनी लुटलेला दोन कोटी होनांचा खजिना आणि पोर्तुगीज बनावटीच्या उत्कृष्ट बारा तोफा हा ऐवज घेऊन स्वराज्य निर्मितीच्या पुढील कार्यासाठी मावळ्यांसह शिवाजीराजे रवाना झाले.*

# जेन-झी, स्पर्धा परीक्षा आणि संयम



सध्याच्या परिस्थितीत जनरेशन झेड बद्दल बोलल्या जाणारा एक अतिशय महत्त्वाचा विषय म्हणजे संयम. आपल्या अवतीभवती जेव्हाही या जनरेशन बद्दल चर्चा होते तेव्हा असे निकष काढले जातात की या जनरेशनमध्ये संयम नावाची गोष्ट नाही . मग विवेकाबद्दल चर्चा करणे तर दूरचीच गोष्ट. मात्र हा विचार कुणी का करत नाही की या जनरेशन मधील संयम नावाचे एक अतिशय महत्त्वाचे मृदू कौशल्य कुठे हरवले आहे ? याचा शोध घेणे आपणास का आवश्यक वाटत नाही. ही जनरेशन १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली पिढी आहे. ही पिढी सामाजिक प्रसार माध्यमाच्या थेट संपर्कात आलेली आहे डिजिटल जगाशी जवळीकता असणे, स्मार्ट विचारसरणी, आत्मविश्वास, स्वातंत्र्याची भावना, करिअर बद्दल मोठ्या मात्र लवकर पूर्ण न होणाऱ्या अपेक्षा या गोष्टी या पिढीमध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात जाणवते. दुसरीकडे हे स्पर्धेचे जग. जनरेशन झेड ही मोठ्या प्रमाणात एमपीएससी, यूपीएससी,बँकिंग, एसएससी अशा परीक्षांकडे वळत आहे या प्रवासात संयम हा सर्वात महत्त्वाचा घटक ठरतो या दोन गोष्टीचे दुवे जोडत असताना नाण्याची एकच बाजू सांगणे योग्य ठरणार नाही. या स्पर्धा परीक्षांचा उशिरा लागणारा निकाल खरं तर विद्यार्थ्यांची कसरत आणि संयमाची परीक्षा मोजत असतो.

स्पर्धा परीक्षा म्हणजे दीर्घकालीन तयारी आणि सातत्याची परीक्षा असते. येथे यश मिळवण्यासाठी अनेकदा प्रयत्न करावा लागतो या परीक्षांमध्ये येणाऱ्या अपयशात चिकाटी आणि मानसिक स्थैर्य कमी असल्यामुळे संयम बिघडत असते. सामाजिक प्रसार माध्यमामुळे ही जनरेशन सतत इतरांचं यश आणि माझा अपयश अशी तुलना करताना दिसते ही तुलनेची भावना आत्मविश्वासाकरिता या जनरेशनला मारक ठरत आहे . मानसिक ताण असणे या जनरेशन समोरची अतिशय मोठी समस्या असून त्यातही परीक्षे संदर्भात माहितीचा भरमसाठ साठा, खूप जास्त स्त्रोत आणि कमी फोकस असणे या गोष्टी या जनरेशनच्या मनावर प्रभाव टाकतात. दीर्घकालीन यशासाठी संयम अतिशय महत्त्वाचा गुण आहे. या जनरेशन बद्दल विचार करताना आपण फक्त नकारात्मक गोष्टी बोलू शकत नाही कारण या जनरेशन मध्ये बदल स्वीकारण्याची तयारी सर्वात जास्त प्रमाणात आहे. सामाजिक प्रश्नाबाबत ही जनरेशन जागरूक आहे विशेषत: राजकारण. नवकल्पना आणि उद्योजकता या जनरेशन मध्ये माफक आहेत आणि हीच या जनरेशनची सर्वात मोठी ताकद आहे. जनरेशन झेड ही मल्टी टास्किंग पिढी असल्याची जाणवते. या जनरेशनच्या काळात ऑनलाइन शिक्षणाच्या संधी वाढल्या, मानसिक आरोग्याबद्दल बोलण्याची तयारी वाढली या पिढीमध्ये स्वत:च्या विकासाबाबत जागरूकता आहेत मात्र विवेक आणि संयम सारख्या गोष्टी कुठेतरी लपलेल्या आहेत. स्पर्धा परीक्षा केवळ बुद्धीची नाही तर संयमाची देखील परीक्षा असते. स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना संयम ठेवणे कठीण वाटते. कधी कधी मेहनत असूनही परिणाम न मिळाल्यामुळे स्वत:वर संशय देखील येते, मात्र अपयशातून धडे घेता यायला हवे. संयमाचा अर्थ कुठेही थांबणे असा होत नाही तर सतत प्रयत्न करत राहणे असा होतो आणि संयम बाळगणे ही कमजोरी नसून हीच खरी ताकद आहे. जनरेशन झेड ही पिढी मेहनती जागरूक आणि ध्येयवादी आहे. योग्य मार्गदर्शन आणि मानसिक बळ मिळाले तर ही पिढी नक्कीच मोठे यश मिळवू शकते.

**– कु. प्रिती रविन्द्र पांडे**
**मो.नं. ७२४९५६२५७३**

# सावधान! अधूनमधून मद्यपान करणेही ठरू शकते घातक



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

विकेंडची पार्टी असो किंवा ऑफिसनंतर कधी तरी मद्यपानाच्या सवय अनेक जण आपल्या जीवन शैलीचा भाग बनवतात. यापासून कोणताही धोका नाही असा त्याचा समज असतो. मात्र, नवीन संशोधनाने




एक धोक्याची घंटा वाजवली आहे. केवळ काही तासांचे 'बिंज ड्रिंकिंग' (अति मद्यपान) सुद्धा तुमच्या आतड्यांच्या रचनेत गंभीर बदल घडवून आणू शकते, असे या संशोधनातून समोर आले आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, मद्यपान केल्यानंतर अवघ्या तीन तासांत लहान आतड्यातील 'व्हिली' (ीळश्रश्रळ) नावाच्या सूक्ष्म घटकांचा आकार आकुंचन पावतो. 'व्हिली' हे हाताच्या बोटांसारखे दिसणारे घटक असून ते अन्नातील पोषक तत्वे शोषून घेण्याचे महत्त्वाचे काम करतात. संशोधकांना असे आढळले की, मद्यपानामुळे या व्हिलीची लांबी कमी होते. शरीरात दाह वाढवणार्या पेशी सक्रिय होतात.

शास्त्रज्ञांनी यापूर्वी नियमित मद्यपान करणाऱ्यांमध्ये 'लीकी गट' नावाची स्थिती यापूर्वीच शोधली होती. यामध्ये आतड्यांचे संरक्षक आवरण कमकुवत होऊन जीवाणू आणि विषारी घटक रक्ताभिसरणात मिसळू लागतात. ताज्या संशोधनानुसार, हा धोका केवळ दीर्घकालीन मद्यपींनाच नाही, तर अधूनमधून अति मद्यपान करणाऱ्यांनाही तितकाच आहे.

युनिव्हर्सिटी ऑफ नॉर्थ कॅरोलिना येथील संशोधक लॉरा रुप्रेक्ट यांच्या मते, आतड्यांमध्ये निर्माण झालेली ही दाहकता शरीराच्या इतर भागांत, विशेषत: मेंदूमध्ये पसरू शकते. यामुळे मेंदूच्या कार्यात अडथळा निर्माण होतो आणि व्यक्तीला पुन्हा पुन्हा मद्यपान करण्याची इच्छा होऊ शकते.

पूर्णपणे मद्यपान टाळणे सर्वोत्तम

आतड्यांचे रक्षण करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे मद्यपानावर नियंत्रण ठेवणे. तज्ज्ञांच्या मते, पूर्णपणे मद्यपान टाळणे सर्वोत्तम आहे.

# श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालयाचे शिवपर्व २०२६ चे उद्घाटन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती** आज शेती ही पारंपरिक पद्धतीने करण्यासोबत उद्यानविद्या विषयातील जोडधंदे आत्मसात केले तर शेतकरी हा आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल.रासायनिक पद्धतीने शेती करून आपण जमिनीचा पोत खराब केलेला आहे, आज त्या शेतीचा पोत दुरुस्त करायची वेळ आलेली आहे, त्याकरिता पुन्हा सेंद्रिय शेती कडे वळावे लागते. उत्पन्न वाढवून आर्थिक दृष्ट्या शेतकरी सक्षम करायची जबाबदारी ही उद्यानविद्या पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आहेअसे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे कोषाध्यक्ष श्री.दिलीपबाबू इंगोले यांनी केले. ते श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय अमरावतीच्या वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम शिवपर्व २०२६च्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी बोलतांना केले. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ड. किरणराव सरनाईक, श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.समिर लांडे उपस्थित होते. यावेळी मंचावर श्री शिवाजी उद्यानविद्यालय अमरावतीचे प्राचार्य चन्द्रशेखर देशमुख, शिवपर्व २०२६चे समन्वयक प्रा. प्रहेश देशमुख, सहसमन्वयक प्रा. कुणाल देशमुख व विद्यार्थी प्रतिनिधी कु . साक्षी धुमाळेउपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यानंतर .यानंतर सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत फुलझाडाचे रोपटे व स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आले. आपल्या उद्घाटनपर भाषणात ड.किरण सरनाईक यांनी विद्यार्थी जीवनात सांस्कृतिक कार्यक्रम किती महत्त्वाचा आहे , सांस्कृतीक कार्यक्रमातून विद्यार्थी सर्वांगीण बाजूने विकसित होतो. नेतृत्वगुण, सांघिक भावना अश्या अनेक गोष्टी ज्या विद्यार्थ्यांना भविष्यात कामी येतात त्या सर्वांची जडणघडण या कार्यक्रमाचे माध्यमातून होते.श्री.दिलीपबाबू इंगोले यांच्या हस्तेड.किरण सरनाईक यांचा शालव श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.या वेळी

प्राचार्य चन्द्रशेखर देशमुख ह्यांनी महाविद्यालयीन प्रगतीचा आलेख व प्रास्तविक केले. विद्यार्थी अहवाल विद्यार्थी प्रतिनिधी कु. साक्षी धुमाळे, संचालन कु . गायत्री कोहळेव आभार प्रदर्शन अथर्व देशमुख यांनी केले.

# ही आहेत टॉप फाईव्ह चाऱ्याची पिके, जनावरांच्या सुदृढ आरोग्य, दूध वाढीसाठी बेस्ट पर्याय

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**



जनावरांच्या सुदृढ आरोग्यासाठी आणि दूध उत्पादनात वाढीसाठी पौष्टिक हिरवा चारा अत्यंत आवश्यक आहे. मका, ज्वारी, बाजरी (एकदल) आणि लसूणघास, चवळी (द्विदल) यांसारखी पिके उत्तम आहेत.




**जनावरांसाठी चाऱ्याची पिके**

जनावरांच्या चाऱ्यासाठी ज्वारी, मका व बाजरीची फेब्रुवारी मध्ये पेरणी करावी. पाण्याच्या उपलब्धतेनुसार उन्हाळी चारा पिकाची लागवड करावी. जनावराना सकाळच्या थंडीपासून बचाव व संरक्षण करावे व गोठा कोरडा ठेवावा. गोठा कोरडा राहील, याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा.

जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरकी पेंड यांचा वापर वाढवावा.

शक्य असल्यास बायपास फॅट आणि प्रथिनयुक्त आहार यांचा वापर वाढवावा.

क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा.

चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल.

गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत.

जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत.

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

### विलीनीकरणानंतर अजितदादांच्या इच्छेनुसार

# NCP प्रदेशाध्यक्षपद डॉ. अमोल कोल्हे हे झाले असते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई –**



राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर विचारलेल्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, मला विलीनीकरणावर बोलायचं नव्हते. पण जर हे दोन पक्ष एकत्र आले असते आणि अजितदादांची इच्छा दोन्ही पक्षांनी एकत्र येण्याची होती. भावनिक दृष्टीने ते विचार करत होते. राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले असते तर महाराष्ट्राचं प्रदेशाध्यक्षपद डॉ. अमोल कोल्हे यांना देण्यात आले असते. दुसऱ्या गटातील लोकांना विलीनीकरणावर बोलायला भारी वाटते. त्यांच्या पत्रकार परिषद पाहिल्या तर त्यांना विलीनीकरणावर बोलायला फार आवडते. आम्हीच अजितदादांचा अपघात की घातपात या विषयावर बोलतोय. त्यामुळे त्यांना ज्या विषयावर बोलायचे आहे त्यावर मी आज बोलले पाहिजे असं वाटत नाही असं त्यांनी सांगितले.

तसेच डॉ. अमोल कोल्हे हे संयुक्तिक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष झाले असते, ती अजितदादांची इच्छा होती. अजितदादांच्या इच्छेप्रमाणे अमोल कोल्हे फार प्रामुख्याने पुढाकार घेत होते. अजितदादांना पक्ष वाढवायचा होता. अमोल कोल्हे यांनीही विलीनीकरणावर स्पष्टीकरण दिले आहे. सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदे बोललेत. ज्यांच्या घरी बैठका झाल्या ते जयंत पाटील बोललेत. १३ बैठका झाल्या होत्या. सीसीटीव्ही फुटेज कुठून घ्यायचे हे सगळ्यांना माहिती आहे. मंत्री लोढा यांच्या घरासमोरचा सीसीटीव्ही बघा, दादा वेगवेगळ्या वाहनातून तिथे आले होते. जयंत पाटील यांनीही स्पष्टीकरण दिले आहे असं रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत म्हटलं.

दरम्यान, सुनेत्रा पवार राष्ट्रीय अध्यक्ष व्हाव्यात यासाठी सगळ्याच आमदारांनी सह्या केल्यात असं नाही. ३५ आमदारांनी सह्या केल्यात. त्या ३५ आमदारांपैकी एखाद्याला विचारले तरी ते विलीनीकरणाबाबत स्पष्ट सांगतील. सर्वच पदाधिकाऱ्यांनी सह्या केल्या नाहीत. सुनेत्रा पवारांसाठी बहुमताने पदाधिऱ्यांनी सह्या केल्या. त्यामुळे ज्यांनी सह्या केल्या नाहीत ते आमदार कोण, ते पदाधिकारी कोण हा संशोधनाचा विषय आहे असा रोहित पवारांनी टोला लगावला आहे.

# मुक्तागिरी येथे जैनेश्वरी दीक्षा सोहळ्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अचलपूर :**



पवित्र तीर्थक्षेत्र श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र मुक्तागिरी येथे १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान भव्य जैनेश्वरी दीक्षा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विद्या शिरोमणी आचार्य श्री १०८ समय सागर जी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व सान्निध्यात हा ऐतिहासिक धार्मिक सोहळा संपन्न होत आहे.चार दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात अभिषेक, शांतिधारा, आचार्य भक्ती, विविध धार्मिक विधी व भजन संध्या आयोजित करण्यात आल्या आहेत. १९ फेब्रुवारी रोजी मुख्य दीक्षा संस्कार सोहळा होणार असून यामध्ये २१ एलक व क्षुल्लक दीक्षा ग्रहण करणार आहेत. या प्रसंगी ३४ पेक्षा अधिक साधू-संत उपस्थित राहणार आहेत.महाराष्ट्र, मध्यप्रदेशसह विविध राज्यांतून सुमारे १५ ते २० हजार भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. भाविकांसाठी निवास, भोजन व भव्य मंडपाची व्यवस्था करण्यात आली असून पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग व सुमारे ६०० स्वयंसेवकांचे सहकार्य लाभत आहे. मुक्तागिरी परिसरात भक्तिमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६

शहर/ग्रामिण

# ‘जनसंवाद’मध्ये १२०० नागरिकांनी मांडल्या समस्या

## ‘जनसंवाद’ला जिल्ह्यात मिळाला उत्स्फुर्त प्रतिसाद

### जागेवरच १३७ निकाली, गावातच ऐकल्या समस्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती–**

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जिल्हा प्रशासनाच्या वतीने नागरिकांच्या समस्या निवारणासाठी आज एकाच दिवशी तालुकास्तरावर 'जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रम पार पडला. जिल्ह्यातील १४ तालुक्यात ११९७ तक्रारी प्रत्यक्ष येऊन समस्या मांडल्यात. यातील १३७ तक्रारींवर जागेवरच समाधान करण्यात आले.जिल्ह्यातील आज पार पडलेल्या तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. अमरावती तालुक्यात ५२, तिवसा ३५, भातकुली ५६, दर्यापूर ८५, अंजनगाव सुर्जी १२३, अचलपूर ७६, चांदुर बाजार ४८, धारणी ४३, चिखलदरा ८०, मोर्शी ७६, वरूड



११०, चांदुर रेल्वे १३६, धामणगाव रेल्वे १३४, नांदगाव खंडेश्वर ४३ अशा एकुण ९९७ तक्रारी नागरीकांनी दाखल केल्या. अचलपूर येथे आमदार प्रविण तायडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, मोर्शी येथे उपजिल्हाधिकारी प्रसेनजित चव्हाण, नांदगाव खंडेश्वर येथे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसिलदार अश्विनी जाधव, अमरावती येथे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, तहसिलदार विजय लोखंडे आदींनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. धारणी तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत जनसंवाद कार्यक्रम पार पडला. यात ग्रामीण ते शहरी भागातील नागरिकांनी विविध विभागांशी संबंधित समस्या थेट प्रशासनासमोर मांडल्या. विशेषतः वीज वितरण, जिल्हा परिषदेचा ग्रामीण पाणीपुरवठा, जलसंधारण, महसूल, शिक्षण, घरकुल योजना, पुनर्वसन, तसेच गॅस वितरणाशी निगडीत तक्रारींचा समावेश होता.

धारणी येथील कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, धारणी नगरपंचायत अध्यक्ष सुनील चौथमल, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, जिल्हा जलसंधारण अधिकारी सुनिल जाधव, तहसिलदार प्रदीप शेवाळे, गटविकास अधिकारी विजय गायकवाड आदी उपस्थित होते. नागरिकांनी शासन दरबारी आपल्या तक्रारी अधिकृतपणे नोंदविल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती महापात्र यांनी प्राप्त तक्रारींचा आढावा घेत संबंधित विभागांशी समन्वय साधून तात्काळ निकाली काढण्याचे निर्देश दिले. या उपक्रमात नागरिकांच्या समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची संधी मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. जनसंवादाच्या माध्यमातून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न होत आहे. जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक तक्रारी, विविध विकास कामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला गेला. तसेच तहसील, जिल्हा परिषद, तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव आणि कृषी सहाय्यकांनी उपस्थिती दर्शवून नागरिकांच्या समस्या निकाली काढण्यासाठी प्रयत्न केले.जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम सुरळीत पार पाडण्यासाठी समन्वयक अधिकारी नेमून त्यांना तालुकानिहाय जबाबदारी सोपवली होती. त्यांच्या मार्गदर्शनात नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व आणि विचार आजही सुसंगत

## शिवजयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे विशेष व्याख्यान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती–**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अमरावती जिल्हा प्रशासनाच्या वतीने आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत या विशेष व्याख्यानाचे आयोजन नियोजन भवन येथे करण्यात आले होते. यावेळी वक्ते प्रा. प्रेमकुमार बोके तसेच डॉ. वैभव मस्के यांनी शिवरायांची विचारधारा, व्यवस्थापन कौशल्य, कार्यकर्तृत्व, त्यांचे शौर्य तसे त्यांचे आजही सुसंगत असलेले विचार यांची यावेळी उपस्थितांना माहिती दिली. अपर जिल्हाधिकारी गोविंद दानेज, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे संचालक श्रीकांत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, तहसीलदार विजय लोखंडे आदी यावेळी उपस्थित होते. प्रेमकुमार बोके यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूंविषयी माहिती दिली. रयतेची काळजी घेणारा, दुष्काळाच्या काळात राज्याची तिजोरी रयतेसाठी खुली करणारा, स्त्रियांचा आदर करणारा, दूरदृष्टी व सूक्ष्म नियोजनात तरबेज, शेत जमिनीची मोजणी करणारा पहिला राजा ते आधुनिक विचारधारा अंगी कारणारा राजा अशा विविध पैलूंवर त्यांनी दाखल्यांसह माहिती दिली.

वैभव मस्के यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाची विविध दाखल्यांसह माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचा दूरदृष्टीकोन, गुणग्राहकता, उत्तम व्यवस्थापन आणि सर्वधर्मसमभाव वृत्ती, त्यांची प्रसंगावधानता ही विविध प्रसंगातून त्यांनी यावेळी व्यक्त केली.

### शिवप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

शहरात शिवजयंतीच्या दिवशी, म्हणजे उद्या, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता भीमटेकडी येथून भव्य बाईक रॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली यशोदा नगर चौक, कल्याण नगर चौक, राजापेठ उड्डाणपूल, राजकमल चौक, श्याम चौक, जयस्तंभ चौक, चित्रा चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक अशा मुख्य मार्गावरून जात शिवटेकडी येथील शिवाजी महाराज पुतळ्यापाशी विसर्जित होईल. या रॅलीचे खास आकर्षण म्हणजे मार्गातील ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. राजकमल चौक, इर्विन चौक आणि माँ जिजाऊ पुतळा परिसर येथे शिवरायांच्या जीवनावर आधारित पथनाट्य सादर केले जाणार आहे. तसेच माँ जिजाऊंच्या पुतळ्याजवळ वीररसातील पोवाड्याचे सादरीकरण करून शिवरायांना मानवंदना दिली जाईल. या सर्व कार्यक्रमांमध्ये अमरावतीकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी प्रास्ताविकेतून केले.कार्यक्रमाचे संचालन श्रीकृष्ण पखाले यांनी तर आभार नायब तहसीलदार श्री रासेकर यांनी मानले.

# चित्रा चौक-टांगापडाव वाहतूक मध्यरात्रीपासून बंद

## उड्डाणपूल बांधकामासाठी वाहतूक मार्गात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

स्थानिक चित्रा चौक ते नागपूरी गेट उड्डाणपुलाचे उर्वरित बांधकाम पूर्ण करण्यासाठी १८ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२६ पर्यंत वाहतूक नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यासाठी लीस उपायुक्त रमेश धुमाळ यांनी अधिसूचना जारी केली आहे.



अधिसुचनेनुसार, टांगा पडाव ते नागपूरी गेट चौकपर्यंत पादचाऱ्यांसह र्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी हिल, चित्रा चौक ते नागपूरी गेट सर्व प्रकारचे जड व हलके मालवाहु तसेच बसेस इत्यादी वाहनांना प्रवेश बंदी राहील. दरम्यान टांगा पडाव-जवाहर गेट-सक्करसाथ-नागपूरी गेट. दिपक चौक-चौधरी चौक-आदर्श हॉटेल-पिंजारा मस्जिद मार्गे नागपूरी गेट. फक्त दुचाकी, कार, ऑटोसाठी पर्यायी मार्ग सुरू राहील मात्र इतर सर्व वाहनांना प्रवेशबंदी राहील.वाहतूक परिस्थितीनुसार वाहतूक थांबविणे व वळविणे याबाबत सर्व अधिकार वाहतूक विभागास राहील.तसेच अत्यावश्यक वेळी जनहित लक्षात घेता सहायक पोलीस आयुक्त वाहतुक अमरावती शहर यांना कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून नियोजित अधिसूचनेमध्ये वाहतूकीच्या नियमनाबाबत अंशतः बदल करण्याचे अधिकार राहील. या अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालक, वाहनधारकांवर मोटर वाहन अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी या कालावधीत सहकार्य करावे आणि वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.दरम्यान, संबंधित प्रकरणाची पुढील सुनावणी २४ फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालयात होणार असून १ मेपासून फ्लायओव्हर सुरू करण्याच्या दृष्टीने प्रशासन प्रयत्नशील आहे. काम वेळेत पूर्ण करण्यासाठी रात्रीच्या वेळीही काम सुरू ठेवण्यात येणार आहे.-

# नगरसेविका नुझहत परवीन यांचे पद रद्द करण्याची मागणी

## तिसऱ्या मुलाची माहिती लपवली, घनश्याम डकरे यांचा आरोप

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१९अमरावती**

अमरावती महानगर पालिकेच्या प्रभाग क्रमांक २१ जुनीवस्ती, बडनेरा येथून निवडून आलेल्या नगरसेविका नुझहत परवीन शाकीर हुसेन यांनी त्यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात तिसऱ्या मुलाची माहिती जाणूनबुजून लपवल्याचा दावा युवा स्वाभिमानचे घनश्याम डकरे यांनी केला आहे. या कथित नियमभंगामुळे त्यांची निवडणूक बेकायदेशीर ठरवून ती तात्काळ रद्द करावी, अशी मागणी त्यांनी राज्य निवडणूक आयुक्त, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच अमरावती महानगरपालिका आयुक्त यांना पत्राद्वारे केली आहे.

पत्रातील माहितीनुसार, नगरसेवकनुझहत परवीन यांनी महानगरपालिका निवडणूक लढविताना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांच्या केवळ दोन मुलांचीच माहिती नमूद केली असून, १२ सप्टेंबर २००१ नंतर




जन्मलेल्या तीन मुलांपैकी एका मुलाची माहिती लपवण्यात आली आहे. तक्रारीनुसार, नुझहत परवीन शाकीर हुसेन यांना एकूण तीन मुले असून त्यापैकी मेहक मशिरा शाह शाकीर हुसेन यांचा जन्म २२ एप्रिल २००५ रोजी, आतिफजुबेर शाह शाकीर हुसेन यांचा जन्म १ मार्च २००७ रोजी, तर इनाया फातिमा शाह शाकीर हुसेन यांचा जन्म २४ डिसेंबर २०१७ रोजी झाला आहे. मात्र निवडणूक प्रतिज्ञापत्रात फक्त दोन मुलांचीच नावे व जन्मतारखा नमूद करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. हे कृत्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे थेट उल्लंघन असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. तसेच, नगरसेवक नुझहत परवीन यांनी निवडणूक लढविताना खोटी माहिती दिल्याने त्यांची उमेदवारी व निवडणूक अवैध घोषित करावी, त्यांना नगरसेवक पदासाठी अपात्र ठरवावे आणि त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात यावी,अशी जोरदार मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान, या आरोपांबर नगरसेवक नुझहत परवीन शाकीर हुसेन यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. निवडणूक विभाग पुढील काय भूमिका घेतो याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

# मेळघाटात मोह हंगाम बहरला

## वनहक्कांमुळे आदिवासी सक्षमपेसा कायद्यामुळे आदिवासींना हक्काचा आधार!

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१९मेळघाट** – मेळघाटात उन्हाळ्याची चाहूल लागताच जंगल परिसर मोहफुलांच्या सुगंधाने दरवळू लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोहफुलांची बंपर आवक झाली असून आदिवासी बांधवांसाठी हा हंगाम म्हणजे उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत ठरत आहे. मेळघाटातील अनेक गावांमध्ये पहाटेपासूनच महिला व पुरुष जंगलात जाऊन मोहफुले वेचताना दिसत आहेत. वेचलेली



मोहफुले वाळवून त्याची विक्री करण्यात येते. या माध्यमातून हजारो कुटुंबांना काही महिन्यांचा रोजगार मिळतो. स्थानिक बाजारात तसेच व्यापाऱ्यांकडे मोहफुलांना चांगली मागणी असून यंदा उत्पादनही समाधानकारक असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पेसा कायदा (झएड-) अंतर्गत आदिवासी भागातील ग्रामसभेला जंगलातील लघुवनउत्पादनांवर हक्क देण्यात आले आहेत. त्यामध्ये मोहफुल वेचण्याचा व विक्री करण्याचा अधिकार स्थानिक आदिवासी बांधवांना प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे मोहफुलाच्या हंगामात ग्रामसभेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. स्थानिकांच्या मते, मोहफुल हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून त्यांच्या परंपरा, संस्कृती आणि जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे. मात्र काही ठिकाणी बाहेरील व्यापाऱ्यांकडून कमी दरात खरेदीकेल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. शासनाने योग्य दर निश्चित करून थेट खरेदी केंद्रे सुरू केल्यास आदिवासी बांधवांना अधिक लाभ मिळू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. एकूणच, मोहफुलाचा हंगाम मेळघाटातील आदिवासी कुटुंबांसाठी आर्थिक दिलासा देणारा ठरत असून जंगलाशी नाते अधिक दृढ करणारा ठरतो आहे.

### मेळघाटात मोहा बँक थंडबस्त्यात

धारणी येथे कार्यरत असताना तात्कालीन प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी मेळघाटातील मोहफुलाच्या भरघोस उत्पादनाची दखल घेत एक अभिनव उपक्रम राबविला होता. मोहफुल हे आदिवासी बांधवांच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी मोहा बँक’ प्रकल्पाची संकल्पना पुढे आणली. या उपक्रमांतर्गत गावपातळीवर मोहा बँक समित्या स्थापन करण्यात आल्या. समित्यांच्या माध्यमातून मोहफुल संकलन, साठवण आणि विक्रीची सुसूत्र व्यवस्था उभी करण्याचा प्रयत्न झाला.या प्रकल्पामुळे आदिवासी बांधवांना योग्य दर मिळण्यास मदत झाली असती तसेच स्थानिक पातळीवरच रोजगारनिर्मितीला चालना मिळाली असती. मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी करून ग्रामसभांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाचा मार्ग खुला करण्याचा उद्देश होता. प्रारंभी या योजनेला चांगला प्रतिसादही मिळाला. मात्र वैभव वाघमारे यांची बदली झाल्यानंतर या महत्त्वाकांक्षी मोहा बँक’ प्रकल्पाकडे दुर्लक्ष झाले. समित्यांची कामे थंडावली आणि उपक्रम थंडबस्त्यात गेला.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आधार अपडेट प्रलंबित

## कर्जमाफीच्या लाभासाठी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** राज्य शासनाकडून शेती क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी प्रस्तावित कर्ज निवारण योजनेची अंमल बजावणी सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्ह्यातील थकीत कर्जदार शेतकरी सभासदांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. मात्र, अद्यापही जिल्ह्यातील सुमारे ३ हजार २९४ शेतकरी सभासदांचे आधार क्रमांक प्राप्त झाले नसल्याने त्यांच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेत तांत्रिक अडथळा निर्माण झाला आहे. शासनाच्या प्रस्तावित कर्जमाफी पोर्टलवर अमरावती जिल्ह्यातील एकूण ७३ हजार ४१३ खाती नोंदवण्यात आली आहेत.



यापैकी प्राथमिक कृषी पत पुरवठा सेवा सहकारी संस्थांचे १ हजार ४५० थकीत कर्जदार आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा स्तरावरील १ हजार ८४४ कर्जदार अशा एकूण ३ हजार २९४ सभासदांची आधार कार्ड माहिती अद्याप अप्राप्त आहे. विहित नमुना प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये ही माहिती भरण्याचे काम सध्या सेवा सहकारी संस्था आणि बँक स्तरावर सुरू आहे.ज्या शेतकऱ्यांचे आधार क्रमांक प्रलंबित आहेत, त्यांनी ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास त्यांना प्रस्तावित योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील संबंधित सर्व शेतकरी सभासदांनी आपल्या संस्थेचे सचिव, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे वसुली अधिकारी किंवा तालुका उप/सहायक निबंधक कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा.

# अचलपूर तहसील कार्यालयात जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम संपन्न

## ७६ तक्रारी दाखल; महसूल विभागाच्या ८ तक्रारींचा जागेवरच निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अचलपूर** :दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय अचलपूर विद्यमाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, अचलपूर येथे जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रविण तायडे (अचलपूर विधानसभा मतदारसंघ) होते.कार्यक्रमास श्रीमती प्रिती देशमुख (प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं., जि.प. अमरावती), बळवंत अरखराव (उपविभागीय अधिकारी, अचलपूर), सुदर्शन शहारे (तहसीलदार), सुधीर अरबट (गट विकास अधिकारी), अक्षय शिरसागर (तालुका कृषी अधिकारी), अभय बाराबदे (उपअभियंता, बांधकाम विभाग), सत्यन पाटील (शाखा अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग अचलपूर) तसेच उमेश शर्मा (शिरस्तेदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख, अचलपूर) यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रस्ताविक भाषणात उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी बळीराजा पांदण रस्ता योजना, तुकडेबंदी कायदा, मामलतदार कायदा, मातोश्री पांदण योजना आदी शासन निर्णयांची सविस्तर माहिती दिली.यानंतर श्रीमती प्रिती देशमुख यांनी घरकुल योजनेअंतर्गत प्रत्येक घरावर सौरऊर्जा पॅनल



बसविण्याच्या योजनेबाबत उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमात तहसील कार्यालय व कृषी पंचायत समितीमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवांचे दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. महसूल विभागामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त दोन कुटुंबांना धनादेश, तसेच संजय गांधी वृद्धापकाळ योजनेअंतर्गत चार आदेशांचे वितरण झाले.कृषी पंचायत समितीमार्फत आत्महत्या व अपघातग्रस्त कुटुंबांतील दोन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रमाणपत्रे, तर पाच लाभार्थ्यांना कृषी साहित्य अनुदान प्रमाणपत्रे देण्यात आली. अध्यक्षीय भाषणात आमदार प्रविण तायडे यांनी नागरिकांना विविध विभागांच्या स्टॉलवर प्रत्यक्ष तक्रार अर्ज सादर करण्याचे आवाहन केले. .

शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सर्व विभागप्रमुखांना सूचना देत, प्राप्त तक्रारींवर सात दिवसांत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. काही तक्रारींवर आमदारांनी थेट हस्तक्षेप करून विभागप्रमुखांसोबत चर्चा करत जागेवरच निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या.या कार्यक्रमात अचलपूर तालुक्यातील २० विभागांकडून एकूण ७६ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी महसूल विभागाच्या २९ तक्रारी दाखल असून ८ तक्रारी कार्यक्रमादरम्यानच निकाली काढण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रोशन ग. महानकर यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


# ३०० पेक्षा अधिक शिक्षकांचे दस्तावेज गहाळ

## आदिवासी विकास कार्यालयातील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ३०० पेक्षा अधिक शिक्षकांच्या जुनी पेन्शन योजनेशी संबंधित महत्त्वाचे मूळ दस्तावेज अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत भाजपच्या शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी लेखी तक्रार सादर करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

शासन निर्णय २ फेब्रुवारी २०२४ तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर यांच्या ७ जानेवारी २०२६ च्या निर्णयानुसार पात्र कर्मचार्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. ढीळलरश्र ऊर्ऩींशिश्रेशिपीं जष-षळलश त्यानुसार आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये कार्यरत कर्मचार्यांनी नियमानुसार अर्ज व




आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. मात्र, संबंधित शिक्षकांचे मूळ दस्तावेज कार्यालयात उपलब्ध नसल्याची बाब समोर आल्याने संताप व्यक्त होत आहे. या पृष्ठभूमीवर संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकार्यांवर कारवाई करावी, तसेच सर्व पात्र शिक्षकांना त्वरित जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी भाजपच्या शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी आदिवासी विकास मंत्री अशोक ऊईके यांच्याकडे केली आहे. संगीता शिंदे यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे, तीन उपसमित्यांच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश असूनही दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, संबंधित शिक्षकांनी एनपीएस/युपीएस पर्यायाबाबत स्पष्टता देत जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी केली आहे. या गंभीर प्रकारामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, शासनाने तत्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# पोलीस प्रशासनाविरोधात वृद्ध शेतकऱ्याचे उपोषण

## चोरी व पिकांच्या नुकसानीबाबत कारवाईची मागणी


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९तिवसा**–पोलीस स्टेशन हद्दीतील ममदापूर शिवारात शेती नुकसानीच्या आणि वारंवार होत असलेल्या चोरीच्या घटनांकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप करीत वणी येथील ७५ वर्षीय शेतकरी दिगांबर गुलाबराव इंगोले यांनी १७ फेब्रुवारीपासून तिवसा पोलीस स्टेशनसमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिगंबर इंगोले यांची शेती ममदापूर शिवारात असून त्यांच्या शेतालगत श्रीमती रंजना राजुभाऊ पाचपोर (रा. पुणे) यांची शेती आहे. सदर शेतीवर गैर अर्जदार म्हणून चंदू श्रीराम वानखडे (रा. ममदापूर) व लक्ष्मण वाघ (रा. तिवसा) हेशेती करत असल्याचे सांगितले




जाते. या दोघांकडून वारंवार इंगोले यांच्या शेतातील शेती साहित्य चोरी करणे, तसेच उभ्या पिकांवर विषारी औषधांची फवारणी करून मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात इंगोले यांनी तिवसा पोलीस स्टेशनमध्ये अनेक वेळा लेखी व तोंडी तक्रारी दाखल केल्या. मात्र, या गंभीर प्रकरणाकडे पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष करून कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही न्याय मिळत नसल्याने अखेर न्यायाच्या मागणीसाठी आणि संबंधित गैर अर्जदारांवर तात्काळ व्हावी या मागणीसाठी इंगोले यांनी कारवाई उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

# ५००१ भाविकांचा श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचा महापारायण सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** –रामा येथील श्री संत वासुदेव महाराज वारकरी शिक्षण सेवा चॅरिटेबल ट्रस्टद्वारा संचालित ज्ञानसागर आध्यात्मिक गुरुकुल, अयोध्या नगरी, चांगापुर येथे जिल्हास्तरीय दोन दिवसीय ३०० सेवेकरांच्या समवेत ५००१ भाविकांचा श्री विजय ग्रंथाचा महापारायण सोहळा २१ व २२ फेब्रुवारीला होणार आहे.




या पाराण्याचे व्यासपीठ नेतृत्वहभप प्रकाश महाराज चैतन्य, आळंदीकर हे करणार आहे. तरी या भव्य दिव्य सोहळ्यामध्ये पारायणा सोबतच वारकरी हरिपाठाचा आनंद व एकनाथी बहुरंगी भारुडाचा कार्यक्रम सुद्धा होणार आहे. भारुड सादरकर्ते ह भ प संतोष महाराज भालेराव त्याचबरोबर हरिभक्त परायण अविनाश महाराज रोडे यांचे काल्याचे किर्तन व दहा हजार भाविकांचा महाप्रसाद होणार आहे. २१ फेब्रुवारी, सकाळी वाजता श्री राम मंदिर येथून ग्रंथ दिंडी सोहळा, ८ वाजता. ग्रंथ पूजन व पारायणास सुरुवात, सायंकाळी,५ वाजता. वारकरी हरिपाठ, रात्री, ७ ते ९ एकनाथी बहुरंगी भारुडाचा कार्यक्रम, २२ फेब्रुवारीला सकाळी,७ वाजता श्रींच्या चरणपादुकांचा अभिषेक, सकाळी ८ वाजता.! ग्रंथ पूजा व पाराण्यास सुरुवात, सकाळी, १० वाजता. काल्याचे किर्तन, दुपारी, १२ वाजता. संत दर्शन सोहळाव नंतर दुपारी १ वाजता. महाप्रसाद, अशी माहिती संस्थाध्यक्ष ह भ प आदित्य महाराज रोडे यांनी दिली आहे.

# शेती विकण्याच्या नावाखाली वृद्धाची ७ लाख रुपयांची फसवणूक

## राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ अमरावती**
,राजापेठ पोलीस ठाण्याअंतर्गत जमीन खरेदी-विक्रीच्या नावाखाली ७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा उघडकीस आला आहे. पोलिसांनी एका महिलेसह पाच आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार, राजेश महावीर प्रसाद शर्मा (५८, प्रसाद नगर) यांनी तक्रार दाखल केली आहे की, नोव्हेंबर २०२४ते ४ डिसेंबर २०२४ दरम्यान आरोपींनी त्यांची शेतजमीन विकण्याचे आश्वासन देऊन त्यांची फसवणूक केली.

तक्रारीनुसार, आरोपी राजू अर्जुनलाल बावळे (५०), संजय अर्जुनलाल बावळे (५२) आणि एक अज्ञात महिला (६०, अजनी) यांनी शेतजमिनीचे खरे मालक असल्याचा दावा करून त्यांना ७/१२ चा जुना कागदपत्र दाखवला आणि तोविकण्याचे आश्वासन दिले. आरोपींनी तक्रारदाराला



सांगितले की शेतीची जमीन भावरीबाईंच्या नावावर आहे आणि करार करण्यासाठी पैशांची मागणी केली. आरोपींनी ४ डिसेंबर २०२४ रोजी तक्रारदाराच्या घरातून फसवणूक करून ७ लाख रुपये रोखघेतले. नंतर असे आढळून आले की १७ मे २०१८ रोजी शेतीची विक्री झाली होती आणि कागदपत्रे जुनी होती. फसवणूक उघडकीस आल्यानंतर राजेश शर्मा यांनी मंगळवारी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे राजापेठ पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध फसवणुकीच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे आणि तपास सुरू केला आहे.

# अमरावती विद्यापीठाचा सामाजिक कार्य पुरस्कार जाहीर

## २६ फेब्रुवारीला होणार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**–संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीत नमूद संदेशाप्रमाणे केलेल्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल दिला जाणारा 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०२५' जाहीर झाला असून गुरूवार, २६ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता विद्यापीठातील डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृह येथे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल.



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने स्व. द. ना. उपाख्य बबनराव मेटकर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार – २०२५' यावर्षी संस्था गटातून दिव्या फाऊंडेशन, वरवंड, जि. बुलढाणा या सामाजिक संस्थेला, तर व्यक्ती गटातून अमरावती येथील सामाजिक कार्यकर्ते मनीष रमेशराव पावडे यांना घोषित झाला आहे. पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व दानदात्यांचे प्रतिनिधी तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. एम. मेटकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. पुरस्कार वितरण कार्यक्रमाला संलग्नित महाविद्यालयांतील प्राचार्य, विद्यापीठ प्राधिकारणींचे सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच समाजसेवक, शहरातील गणमान्य नागरिक व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले आहे.

# तालुकास्तरीय भव्य महिला भजन स्पर्धेत गीताई महिला भजन मंडळ प्रथम तर द्वितीय पारितोषिक सखी सहेली महिला भजन मंडळने पटकविले

## जिल्हा काँग्रेस चे आयोजन, बक्षीस वितरण सोहळा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ चांदूरबाजार**

अमरावती जिल्हा ग्रामीण काँग्रेसच्या आयोजनातून मा. जि.प. अध्यक्ष बबलुभाऊ देशमुख यांच्या संकल्पनेतून आयोजित तालुकास्तरीय भव्य महिला भजन स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या स्पर्धेत तब्बल १०५ महिला भजन मंडळांनी सक्रिय सहभाग नोंदवत अध्यात्म, संस्कृती आणि महिला सक्षमीकरणाचा सुंदर संगम घडवून आणला.स्पर्धेतील प्रथम पारितोषिकाचे मानकरी गीताई महिला भजन मंडळ ठरले असून त्यांना ११,००० रुपये रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. द्वितीय पारितोषिक सखी सहेली महिला भजन मंडळ यांना ७,००० रुपये, तर तृतीय पारितोषिक विठ्ठल-रुख्मिणी महिला भजन मंडळ यांना ५,००० रुपये रोख स्वरूपात




देण्यात आले.चतुर्थ ते पंधराव्या क्रमांकापर्यंतच्या विजेत्या मंडळांना मृदंग भेट देऊन गौरविण्यात आले. यामध्ये आई भवानी महिला भजन मंडळ, सर्वज्ञ महिला भजन मंडळ, संत गुलाब बाबा महिला भजन मंडळ, श्री मंगेश महाराज महिला भजन मंडळ, रुक्मिणी महिला भजन मंडळ, गजानन माऊली महिला भजन मंडळ, मॉ. भवानी महिला भजन मंडळ, ज्ञानेशकन्या श्री संत गुलाबराव महाराज महिला भजन मंडळ, आजाद महिला भजन मंडळ, मारोती महाराज शितलमाता महिला भजन मंडळ तसेच माऊली सेवाधारी भजन मंडळ यांचा समावेश होता. सर्व विजेत्या मंडळांचे मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक बक्षीस वितरण करण्यात आले.या सोहळ्यास जिल्हाध्यक्ष बबलूभाऊ देशमुख, खासदार बळवंतराव वानखडे, सौ. किरणताई बबलुभाऊ देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यावेळी बाळासाहेब अलोने, डॉ. प्रतापराव किटुकले, अरविंदराव लंगोटे, किशोर देशमुख, राजाभाऊ बंड, किशोरराव किटुकले, योगेशभाऊ पवार, विलास शेकार, किशोरभाऊ देशमुख, नामदेवराव तनपुरे, राहुल गवई, राहुल गाठे, सचिदानंद बेलसरे, उत्कर्ष देशमुख, शिवाजीराव काळे, नरेंद्र हिवे, योगेशराव ईसळ, पल्लवीताई वाटाणे, मंगेशराव देशमुख, भोलाभाऊ मदने, भास्करराव हिरडे, सचिनराव हिवराळे, गजाननराव देशमुख, मनोज देशमुख, अंकुशराव धाकडे, राजाभाऊ धनसांडे, पंकज कडू, पंकज नेहारे, राहुल वाटाणे, निलेश डांगे, साक्षी धनसांडे, अभिषेक बोंडे, प्रितम मानापुरे, नकुल देशमुख, शाहू बोंडे, श्रेयस बरवे, भुषण देशमुख, शंतनु फुलझेले, सोपान पोहोकार, आदित्य देशमुख, संविधान मोहोड आदी पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन निखील काटोलकर यांनी केले. स्पर्धेमुळे तालुक्यातील महिलांना आपली भक्तीगायन कला सादर करण्याचे व्यासपीठ उपलब्ध झाले असून, या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

# अपघातानंतर वरुड रुग्णालयात तणावाचे वातावरण

## अपघातानंतर उमटले पडसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वरुड** शिवाई बस व ऑटोरिक्षा अपघातानंतर ग्रामीण रुग्णालयात तणावाचे वातावरण दिसून आले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने भाडेतत्त्वावर चावविल्या जातात.

या अपघातात मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना २० लाखाची सानुग्रह मदत परिवहन विभागाकडून देण्यात यावी अशी मागणी विभागीय नियंत्रक निलेश बेलसरे यांच्या उपस्थितीत सामाजिक कार्यकर्त्यांसह मृतकाच्या नातेवाईकांकडून करण्यात आली आहे.

अपघातानंतर घटना स्थळावरची परिस्थिती पाहील्यावर अपघातास प्रथमदर्शनी बस चालक जबाबदार असल्याचे दिसत आहे. प्रत्यदर्शींचे तेच म्हणने आहे. थर्रीव कैीर्ळींरश्र सामान्य नागरिकांमध्ये अपघातानंतर प्रचंड संतापाची भावना होती. रुग्णालयात खूप गर्दी जमल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

पोलिसांनी तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला. नातेवाईकांचा आक्रोश मन हेलावणारा होता. या घटनेने परिसरात शोककळा पसरली होती. पोलिसात बसचालका विरूद्ध तक्रार होताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बस ताब्यात घेण्यात आली असून चालकाला अटक करण्यात आली.

रा. प.च्या नियमानुसार त्रयस्त वाहनातील व्यक्ती मृत पावल्याने तत्काळ मदत देता येत नाही. परंतु, अपघाताचे गांभीर्य व सविस्तर घटना बघता मृत कुटुंबीयांच्या वारसास नियमाप्रमाणे व न्यायालयाच्या आदेशानुसार त्वरित सर्वतोपरी मदत व सहकार्य करण्यात येईल असे आश्वासन एस. टी महामंडळ विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांनी दिले.

अपघात मृत झालेल्यांच्या अंत्यविधीसाठी प्रशासनाच्या वतीने प्रती व्यक्ती १० हजाराची आर्थिक मदत नातेवाईकांकडे सोपविण्यात आली आहे.

# नदीपात्रातील अतिक्रमण हटवण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अंजनगाव सुर्जी**–नदीपात्रातील विहिगाव आणि रस्त्यावरील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे लवकरात लवकर काढून टाकण्याचे आदेश तहसिलदार सोळंके यांनी दिले आहेत.



विहिगाव नदीपात्रातील सरकारी जागेवरील अतिक्रमण आणि अवैध उत्खननाचा प्रश्न आता मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाच्या संदर्भात तक्रारदार रणजित देविदास राक्षसकर, आणि आंबेडकरी कार्यकर्त्यांनी तहसीलदार पुष्पाताई सोळंके यांची भेट घेतली. यावेळी तक्रारदारांनी नदीकाठावरील अतिक्रमणामुळे हिंदू स्मशानभूमी आणि गुणवंत महाराज मंदिराकडे जाणारा रस्ता वस्तुस्थिती मांडली. यामध्ये स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग असल्याचा आरोप पत्राद्वारे करण्यात आला असून, या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात अरुंद झाल्याची ग्रामपंचायत कर्मचारी नदीपात्रातील आणि रस्त्यावरील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे लवकरात लवकर काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. पुढील दोन दिवसांत हे अतिक्रमण हटवण्यात येईल, असे आश्वासन तहसीलदार मॅडम यांनी उपस्थित आंबेडकरी कार्यकर्त्यांना दिले. या आदेशामुळे आता स्थानिक प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली असून अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले आहेत. नदीपात्रात गौण खनिज उत्खननासाठी कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नाही, हे तहसीलदारांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल केलेल्या तक्रारीनंतर मंडल अधिकारी आणि तलाठी यांनी केलेल्या स्थळ तपासणीचा अहवालही आता समोर आला आहे आणि आली आहे.

तक्रारीची दखल घेत तहसीलदार सोळंके यांनी तातडीने पावले उचलली आहेत. त्यांनी विहीगाव ग्रामपंचायतच्या सचिवांना स्पष्ट निर्देश दिले असून,

# नागमंदिर संस्थान येथे धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चांदूर रेल्वे**–
तालुक्यातील चांदूरवाडी जवळील श्री क्षेत्र नाग मंदिर संस्थान, गव्हाळा येथे आज (ता. १९) श्री संत मंगेश महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन उत्साहात करण्यात आले आहे.

प्रकट दिनानिमित्त पहाटेपासूनच भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून सकाळी ७.३० वाजता बाबांचे पाद्यपूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर श्री संत मंगेश महाराज स्वरांजली संच, चांदूर रेल्वे यांच्या वतीने 'भजनाचा कार्यक्रम, सकाळी ९.३० वाजता महाराजांची तुला पार पडणार असून सकाळी १०.३० वाजता बाबांचे आशीर्वादपर शब्द होणार आहेत. दुपारी १२ वाजता महाराजांची महाआरती होऊन ममहाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय नागमंदिर संस्थान येथे २१ ते २८ फेब्रुवारी दरम्यान संगीत श्रीमद् भागवत व हरीकीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात भागवत वाचक म्हणून ह.भ.प. आशिष महाराज तसरे (सालोरा बु.) मार्गदर्शन करणार आहेत.

दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत भागवत कथा होणार असून त्यानंतर हरीकीर्तन सेवा व भजनाचा कार्यक्रम होईल. सप्ताहाची सांगता २८ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. लक्ष्मणदास काळे महाराज, आमला विश्वेश्वर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून दुपारी २ वाजल्यापासून महाप्रसादाला सुरुवात होणार आहे. या सर्व धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नागमंदिर संस्थानतर्फे भाविकांना करण्यात आले आहे.

# अमरावतीतील ५५२ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम सुरु

## उद्यापासून प्रभाग रचना; ३० मार्चला प्रारुप यादी, १३ एप्रिलपर्यंत हरकती

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९अमरावती

अमरावती जिल्ह्यातील ५५२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ नुकताच संपुष्टात आला आहे. शुक्रवार, २० फेब्रुवारीपासून या ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेची निश्चिती प्रक्रिया सुरू होईल. ३० मार्च रोजी मतदार संघाचे प्रारुप घोषित केले जाईल, तर १३ एप्रिलपर्यंत या प्रारुपावर हरकती व सूचना नोंदवता येणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या सहसचिव वर्षा भरोसे यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या राज्यभरातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका येत्या काळात घेतल्या जाणार आहेत. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ५५२ ग्रामपंचायतींचा समावेश आहे, ज्यांचा कार्यकाळ १० ते १८ फेब्रुवारीदरम्यान संपला आहे.

आयोगाच्या वेळापत्रकानुसार, २० फेब्रुवारीपासून तहसीलदार संबंधित ग्रामपंचायतींचे नकाशे (भौगोलिक क्षेत्र) अंतिम करण्यास



सुरुवात करतील. पुढील आठवडाभरात ग्रामसेवक आणि तलाठी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून ग्रामपंचायतींच्या मतदारसंघांच्या सीमा निश्चित करतील. ५ मार्चपर्यंत मंडळ अधिकारी, बीडीओ आणि तहसीलदार यांच्या संयुक्त समितीतर्फे तलाठी व ग्रामसेवकांनी दिलेल्या अहवालाची पडताळणी केली जाईल.

तयार झालेल्या मतदारसंघांच्या सीमांची माहिती संबंधित एसडीओमार्फत ११ मार्चपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली जाईल. जिल्हाधिकारी त्यांच्या स्तरावर मतदारसंघांच्या सीमांकनाची पडताळणी करून आवश्यकतेनुसार दुरुस्त्या करतील आणि अंतिम मसुदा राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवतील.

आयोगाने आखून दिलेल्या सीमेनुसार ३० मार्च रोजी प्रभाग रचनेचे प्रारुप घोषित केले जाईल. हे प्रारुप ग्रामपंचायतींसह जिल्हा परिषद मुख्यालय आणि तहसील कार्यालयांमध्ये नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून दिले जाईल. या प्रारुपावर नागरिकांकडून हरकती व सूचना मागवण्यात येतील. हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख १३ एप्रिल असून, एसडीओ यांच्या न्यायालयात २३ एप्रिलपर्यंत सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. सुनावणी पूर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतींच्या मतदारसंघांची रचना अंतिम टप्प्यात येईल. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत २८ एप्रिलपर्यंत ती राज्य निवडणूक आयोगाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पाठवली जाईल. अशा प्रकारे मतदारसंघ रचनेची प्रक्रिया एप्रिलअखेर पूर्ण होईल. राज्य निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी म्हणून जिल्हाधिकारी ४ मे रोजी सर्व ५५२ ग्रामपंचायतींच्या मतदारसंघांची अंतिम प्रभागरचना घोषित करतील.

# पळस बहरला।.....





उन्हाळ्याची चाहूल लागताच निसर्गातील बदल जाणवू लागले आहे मेळघाट मधील राणमाळावर झाडाची पानगळ होऊन पळसाची हि झाडे केशरी रंगांनी फुलले असून जणू ते रंगाची उधळण करत असल्याचे जाणवते.

# सरपंच संघटनांच्या याचिकेमुळे उच्च न्यायालयाने नेमणुका थांबवल्या; आता २४ फेब्रुवारीला सुनावणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९अमरावती

अमरावती जिल्ह्यातील ५५२ ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा विषय पुन्हा लांबणीवर पडला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात या प्रकरणाची सुनावणी झाली, परंतु प्रशासनाने अधिक वेळ मागितल्याने पुढील सुनावणी आता २४ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने शासनाने पंचायत विभागाच्या विस्तार अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नेमण्याचे आदेश दिले होते. मात्र, सरपंच संघटनांनी या आदेशाला न्यायालयात आव्हान दिले. त्यामुळे प्रशासकांच्या नेमणुका तात्पुरत्या टळल्या आहेत.

यापूर्वी, गेल्या सोमवारी सर्व ग्रामपंचायतींवर विस्तार अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, त्याच दिवशी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने पुढील आदेश येईपर्यंत अशा नियुक्त्या रोखण्याचे आदेश दिले. यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाच्या सीईओ संजीता महापात्र यांनी जारी केलेले आदेश स्थगित झाले.

मंगळवारी या प्रकरणाची सुनावणी झाली, परंतु कोणताही अंतिम निष्कर्ष निघाला नाही. प्रशासनाने अधिक वेळ मागितल्याने आता २४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.प्रशासकीय राजवटीखाली येणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये धामणगाव रेल्वे तालुक्यातील सर्वाधिक ५५ ग्रामपंचायती आहेत. त्यापाठोपाठ नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील ५१, दर्यापूर तालुक्यातील ४९, अमरावती तालुक्यातील ४६, अचलपूर तालुक्यातील ४३, चांदूर बाजार व वरुड तालुक्यातील प्रत्येकी ४१, मोर्शी तालुक्यातील ३९, भातकुली तालुक्यातील ३६, धारणीतील ३५, अंजनगाव सुर्जीतील ३४, चांदूर रेल्वे व मोर्शी तालुक्यातील प्रत्येकी २९ आणि चिखलदरा तालुक्यातील २४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या सर्व ग्रामपंचायतींचा कार्यकाळ १० ते १८ फेब्रुवारीदरम्यान संपुष्टात आला आहे.

# आ. प्रताप अडसड यांनी घेतला बेंबळा प्रकल्पाचा आढावा

## अपर जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९ चांदूर रेल्वे



अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी यांचे दालनात आमदार प्रताप अडसड यांचे अध्यक्षतेखाली व अपर जिल्हाधिकारी, अमरावती तसेच उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन, अमरावती यांचे उपस्थितीत बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांचा पुनर्वसन व भूसंपादनाचा आढावा घेतला.बेंबळा प्रकल्पांतर्गत चांदूर रेल्वे तालुक्यातील मौजा येरड येथील पुनर्वसन मौजा ओंकारखेडा व खरबी येथे करण्यात आले. त्यापैकी मौजा ओंकारखेडा येथे सर्वे नंबर ६१ व ६२ तसेच मुंडबारी सर्वे नंबर ५१ मधील अभिन्यासात भूखंड वाटप करण्यात आले आहे. प्राप्त भूखंडाचे ७/१२ व ८ अ तयार न झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना शासकीय योजनेच्या लाभापासून वंचीत राहत असल्याचा मुद्दा चर्चेत आला असता, उपअधिक्षक, भूमि अभिलेख, नांदगाव खंडेश्वर यांचे कार्यालयाकडून मोजणी न झाल्यामुळे कमी जास्त पत्रक तयार करता आले नाही. त्यामुळे सात बारा व आठ अ तयार करण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. येत्या आठवडेयाभरात अभिन्यास मोजणीची फी भरणा करण्याबाबत कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांना निर्देश दिले.धामक या गावाचे पूर्वी अंशतः संपादन करणे प्रस्तावित होते. सदर गावाचे पुनर्वसन प्रक्रीया अंतीम टप्प्यात होती. त्यादरम्यान मुख्यमंत्री यांची २८ मे २०१५ रोजी बेंबळा प्रकल्पस्थळी दिलेल्या भेटी दरम्यान मौजा धामक गावाचे पूर्णतः आदर्श पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले. त्याअनुषंगाने सदर गावाची पुनर्वसन प्रक्रिया प्रगतीपथावर होती. त्यानंतर प्रकल्पाची संचय पातळी १.५० मी. ने कमी करण्यात येऊन २६८ मी. करण्यात आली. त्यामुळे सदर गावाचे पुनर्वसन रद्द करण्यात आले होते. सद्यस्थितीत धामक गावाचे पुर्णतः पुनर्वसन करण्याचे प्रस्तावास नियामक मंडळाची २४ सप्टेंबर २०२४ रोजीच्या बैठकीनुसार मान्यता प्राप्त असून सदर गावाची पुनर्वसनाची कार्यवाही मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

भूसंपादन प्रस्ताव यंत्रणेमार्फत सादर केलेला असून त्याबाबतची संयुक्त मोजणी ची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने ती लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतच्या सूचना आमदार महोदयांनी दिल्यात. या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या मौजा एकलारा, झिबला, बेलोरा, येरड, घुईखेड, सावंगा (बु.), टिटवा व धामक या ८ ही गावांना दर्जेदार नागरी सुविधा पुरविणे तसेच मौजा धामक चे आदर्श पुनर्वसनाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे तसेच पुनर्मुल्यांकन करणे बाबत ही निर्देश प्रताप अडसड यांनी दिलेत.सदर बैठकीस अपर जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) श्रध्दा उदावंत (उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे), बेंबळा प्रकल्प यवतमाळचे कार्यकारी अभियंता सागर काळे, भूमि अभिलेख नांदगाव खंडेश्वरचे उपअधिक्षक निशांत नागरगोजे तसेच पुनर्वसित गावातील प्रकल्पग्रस्त संदीप सोळंके, संबंधित मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व पुनर्वसन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पाचव्या आई महोत्सवात संत अच्युत महाराज साहित्य संमेलन

## संमेलनाध्यक्षपदी ॲड. संत सचिन देव महाराज



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९दर्यापूर

आपल्या अभिनव आयोजनाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष केंद्रीत करणारा दर्यापूर येथील 'आई महोत्सव या बहुआयामी कार्यक्रमाचे आयोजन १ ते ११ मे या दरम्यान दर्यापूर येथे करण्यात आले असून या महोत्सवात में या दिवशी एकदिवसीय तिसरे संत अच्युत महाराज साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी ब्रम्हलीन संत अच्युत महाराज यांचे परमशिष्य हभप ॲड. संत सचिन देव महाराज उपस्थिती देऊन आपल्या अमृततूल्य वाणीने संबोधित करणार आहेत. दर्यापूर येथे आपल्या वार्षिक महाशिवरात्री प्रबोधन सप्ताहात उपस्थित संत सचिन देव महाराज यांचा यथोचित सत्कार करून आई महोत्सव संकल्पनेचे जनक तथा गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक प्रा. गजानन भारसाकळे यांनीमहाराजांना अध्यक्षपद भूषविण्याची तथा संमेलनाचे संमेलन आयोजन परवानगीची प्रार्थना केली. याप्रसंगी दर्यापूर-बनोसा बाभळी संत अच्युत महाराज सत्संग मंडळाचे अध्यक्ष ॲड. किरण मोकासदार, सौ. अपर्णाताई मोकासदार, महाराजांचे दैनंदिन सहकारी बंडू गावंडे, यांची प्रामुख्याने उपस्थिती एकनाथ देवळे, शुभम देवळे होती.संत अच्युत महाराजांचा प्रबोधनपर साहित्य निर्मितीचा व्यासंग अतिशय प्रचंड असून त्यांच्याद्वारे ग्रंथ व पुस्तक निर्मितीचे सर्व साहित्याला साहित्य अलौकिक कार्य घडल्याने या संमेलनाद्वारे उजाळा देऊनच मानवंदना दिल्या जाऊ शकते, यासाठी या संमेलनाचे आयोजन असल्याचे प्रा. भारसाकळे यांनी याप्रसंगी विशद केले. याअगोदरचे दोन्ही साहित्य संमेलने ही अमरावती येथे पार पडले असून या निमित्याने संत अच्युत तिसऱ्या साहित्य संमेलनाच्या महाराजांच्या निष्काम कार्याचीज्योत अखंडपणे तथा प्रखरतेने तेवत ठेवणारे संत ॲड. सचिन देव महाराज यांच्या कर्मयोगी कार्यावर प्रकाश टाकणारा एक गौरवग्रंथ प्रकाशित होणार असून संत अच्युत महाराजांचे लिखाण करण्याची संधी या संमेलनाद्वारे प्राप्त होणार आहे, भाविव भक्तांना या ग्रंथात स्पर्धाचेही नियोजन करण्यात तसेच या निमित्याने विविध येत आहे देश विदेशभर पसरलेल्यासाहित्य संमेलन आयोजन या दिवशी स्थानिक रामदेव बाबा मंदिर परिसरापासून मिरवणुकीचेसुद्धा आयोजन साहित्य स्थळापर्यंत महाराजांच्या ग्रंथ दिंडी-पालखी करण्यात येणार आहे. यानिमित्याने पुनश्च एकदा अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे अच्युत महाराजांच्या भरीव तथा लोक कल्याणकारी साहित्य निर्मितीनिमित्त लक्ष केंद्रीत करून त्यांना मरणोत्तर डी. लिट. पदवी मिळण्याची मागणी करण्यात येणार आहे. अच्युत महाराजांचा भक्त परिवार मोठ्यासंख्येने असल्याने सर्वाचे लक्ष या साहित्य संमेलनाकडे केंद्रीत होणार असल्याचे संकेत प्राप्त झाले असून पाचव्या आई महोत्सव आयोजनाबाबत सर्व भक्तगणांनी गाडगेबाबा मंडळावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# नेरपिंगळाईला होणार अप्पर तहसील कार्यालय

## आ. राजेश वानखडे यांच्या पाठपुराव्याला यश

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९अमरावती

तहसील कार्यालयाचे विभाजन करून अतिरिक्त तहसील कार्यालय व मोर्शी तहसीलचे विभाजन करून नेरपिंगळाई येथे अप्पर तहसील कार्यालय निर्माण करण्याबाबत तिवसा विधानसभेचे आ. राजेश वानखडे यांनी गेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केलेली होती. या मागणीला अंशतः यश मिळाले असून, नेरपिंगळाई येथे अप्पर तहसील कार्यालयाच्या निर्मितीस शासनाकडून आहे. मान्यता मिळालीअमरावती शहर व तालुक्याचा व्याप दिवसेंदिवस वाढला आहे. अमरावती तालुक्यात एकूण १५९ महसुली गावे समाविष्ट आहेत. तालुक्याची लोकसंख्या अंदाजे १३ लक्षच्या वर पोहोचलेली आहे, तसेच शहराच्या लागून असलेली खेडी शहराच्या दिवसेंदिवस वाढत्यालोकसंख्येमुळे जवळ येत आहेत. अमरावती तहसील अंतर्गत शहर व आजूबाजूचा ग्रामीण भाग असे मिळून ५९ तलाठी साज्यांचा समावेश आहे. अमरावती शहराच्या मुख्यालयापासून शेवटचे जमडोल हे गाव ४० किमी अंतरावर आहे.कामाचा व्याप पाहता आ. राजेश वानखडे यांनी १५ डिसेंबर २०२५ व ५ फेब्रुवारी मोर्शी व अमरावती तालुक्याच्या २०२६ रोजीच्या पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अतिरिक्त अमरावतीतहसील कार्यालय निर्माणबाबत मागणी गेल्या वर्षीच अद्ययावत प्रस्ताव राज्य केलेली होती. या मागणीच्या अनुषंगाने शासनाकडे जिल्हाधिकारी अमरावती यांच्यावतीने सादर करण्यात आला होता.शिफारशींच्या अनुषंगाने पात्र ठरून सदर प्रस्ताव व दांगट समितीच्या अमरावती तहसील कार्यालयाचे विभाजन असे नवीन तहसील कार्यालय निर्माण करण्याकरिता शासनाने मंजुरी दिल्यामुळे करून अतिरिक्त तहसीलदार अमरावती आता अमरावती तालुक्याचा प्रशासकीय कारभार हा सुटसुटीत होणार आहे.

# अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'शितादई' चा समावेश

विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अचलपूर

नव्या पिढीला वहाडी बोलीभाषेतील साहित्याची गोडी लागावी आणि लोक संस्कृतीचा परिचय व्हावा, या उद्देशाने, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनएपी) बीए द्वितीय वर्षाच्या चौथ्या सत्रासाठी मूळच्या पातूर येथील आणि सध्या परतवाडा येथे वास्तव्यास असणाऱ्या प्रा. वृषाली बिजय देवकर



यांच्या 'शितादई या लोकप्रिय वऱ्हाडी कवितेचा समावेश करण्यात आला आहे.प्रा. वृषाली देवकर या सध्या अचलपूर येथील स्व. छगनलाल मुलजीभाई कढी महाविद्यालयातयशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्रात कार्यरत आहेत. त्यांनी एमए, डीएड पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असून सध्या त्या स्त्रीवादी साहित्यावर संशोधन करत आहेत. केवळ अध्यापनच नव्हे, तर साहित्य क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी 'माझे राजेशाही' या सदराखाली केलेले लेखन आणि आकाशवाणीसह दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवरील 'हास्य पंचमी', 'हास्यरंग व 'अनवट स्वाद' यांसारख्या कार्यक्रमातून विदर्भाच्या वऱ्हाडी संस्कृतीचे समर्थपणे नेतृत्व केले आहे.त्यांच्या या साहित्यिक प्रवासाची दखल घेत त्यांना वऱ्हाडरत्न, युवाभूषण, सखीसम्राज्ञी आणि कवीरत्न यांसारख्या अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 'वऱ्हाडी कविता' या संपादनांतर्गत समाविष्ट करण्यात आलेली 'शितादई' ही कविता पश्चिम विदर्भातील शेती, कष्टकरी वर्ग आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव अत्यंत प्रभावीपणे मांडते. कापूस आणि काळ्या मातीशी असलेले नाते या कवितेतून अधोरेखित होते. याबद्दल प्रा. वृषाली देवकर गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, यांनी आनंद व्यक्त केला असून संत मराठी अभ्यास मंडळ, संपादक मंडळ तसेच प्राचार्य डॉ. काशीनाथ बहाटे, डॉ. अशोक इंगळे आणिडॉ श्रीकृष्ण पद्मने यांचे आभार मानले आहेत.

# दर्यापुरात नाफेड अंतर्गत तूर खरेदीस प्रारंभ



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९दर्यापूर

तालुका खरेदी-विक्ली संस्था दर्यापूरच्यावतीने शासकीय तूर खरेदी करण्याच्या मागणीला यश आले असून तूर खरेदीचा शुभारंभ खरेदी-विक्रीच्या गोडाऊन येथे खा. बळवंत वानखडे व आ. गजानन लवटे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुनील पाटील गावंडे, काँग्रेस तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे,खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष गजानन जाधव, उपाध्यक्ष प्रभाकर पाटील कोरपे, कृषी उत्पन्न उपसभापती श्रीकृष्ण ऊर्फ राजेंद्र बाजारसमिती पाटील कराळे, सहायक निबंधक किशोर बलिंगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.सुरुवातीला प्रथम शेतकरी विजय पाटील साखरे (धुमाळे) यांचा खा. बळवंत वानखडे यांच्याहस्ते नारळ, पुष्पहार, दुपट्टा देऊन सत्कार करण्यात आला. याचप्रसंगी मापारी यांचा आ. गजानन लवटे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. काटा पूजनसुद्धा करण्यात आले, तसेच उपस्थित सर्व याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार दर्यापूर पदाधिकारी तालुका खरेदी-विक्री संघाचे यांच्याहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक राजू पाटील गावंडे यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार मधू पाटील पाचे यांनी मानले. यावेळी देशमुख, अमोल धर्माळे, कृषी खरेदी-विक्रीचे सुशीलकुमार गावंडे, अमोल संचालक डॉ. दिनकर गायगोले, तथा तालुका खरेदी- विक्री संघ उत्पन्न बाजारसमिती संचालक संचालक उपस्थित होते.

# महसुली गावातच आता कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना मंजुरी

## नोंदणीचे सुधारित निकष जाहीर; आर्थिकदृष्ट्या कमकुवत संस्थांवर कडक धोरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१९अमरावती

आता महसूली गावातच कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना मंजूरी देण्याचे नवीन धोरण शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने निश्चित केले असून आर्थिकदृष्ट्या कमकुवत संस्थांवर कडक धोरण राबविले जात आहे. यावावत सुधारीत निकष जाहीर केले आहे.

शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने राज्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या नोंदणीसंदर्भातील निकषांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा



केल्या आहेत. पूर्वीच्या २३ सप्टेंबर २०१३, १६ जानेवारी २०१५ व १४ फेब्रुवारी २०१७ च्या निर्णयांमध्ये सुधारणा करून नव्या निकषांनुसार राज्यात कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या नोंदणीची प्रक्रिया अधिक काटेकोर करण्यात आली आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या प्रस्तावानुसार व सहकार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ४ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला. नवीन नोंदणीसाठी महत्त्वाचे निकष असणार आहे एका महसुली गावात एकाच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थेस परवानगी राहणार आहे. संभाव्य पीक कर्जपतपुरवठाबाबत निकष निश्चित केले आहे. मराठवाडा व विदर्भाकरिता किमान १ कोटी तसेच आदिवासी भागातील गावांना किमान ५० लाख कर्ज पुरवठ्याची मर्यादा असणार आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत संस्थांबाबत कडक धोरण निश्चित करण्यात आले. काही संस्थांचे विलीनीकरण शक्य असल्यास सक्षम संस्थेत विलीनीकरण केले जाणार आहे. आर्थिक सक्षमीकरण शक्य असल्यास २०२६-२७ ते २०२८-२९ वा तीन वर्षांसाठी कृती आराखडा ३० जून २०२६ पर्यंत सादर करणे बंधनकारक करण्यात आले असून कृती आराखडा न सादर करणाऱ्या किंवा तीन वर्षांत सक्षम न ठरणाऱ्या संस्थांचे विलीनीकरण अथवा अवसायनाची कारवाई केली जाईल.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त अमरावती जिल्हा भगवामय

## शहरासह ग्रामीण भागात भव्य मिरवणुका; पारंपरिक वाद्यांनी दुमदुमला परिसर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज अमरावती जिल्ह्यात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. पहाटेपासूनच शहरासह ग्रामीण भागात शिवजयंती मिरवणुकांची जय्यत तयारी करण्यात आली होती. ठिकठिकाणी भगवे झेंडे, आकर्षक रोषणाई आणि शिवकालीन देखाव्यांनी संपूर्ण जिल्हा भगवामय झाल्याचे चित्र होते.जिल्ह्यातील विविध भागांतून भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. प्रमुख मार्गांवरून निघालेल्या मिरवणुकांमध्ये पारंपरिक ढोल-ताशा पथके, लेझीम पथके, तसेच शिवचरित्रावर आधारित आकर्षक चित्ररथांचा समावेश होता. तरुणाईचा मोठा सहभाग यंदाच्या उत्सवाचे वैशिष्ट्य ठरले.



शिवभक्तांनी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी वातावरण दणाणून सोडले.अनेक ठिकाणी शिवकालीन मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी-काठी अशा पारंपरिक युद्धकलेचे दर्शन घडवत शिवरायांच्या शौर्याची आठवण करून देण्यात आली. काही शहरांमध्ये डीजे संस्कृतीला फाटा देत पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्यात आले, यामुळे उत्सवाला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्वरूप लाभले.शिवजयंती उत्सव समित्यांनी यंदा शिस्तबद्ध नियोजनावर भर दिला होता. वाहतूक व्यवस्थेसाठी पोलिस प्रशासनाने विशेष बंदोबस्त ठेवला होता. उत्सवासाठी रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली आहे.ग्रामीण भागातही ग्रामस्थांनी एकत्र येत शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि विविध मंडळांनी शिवप्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.एकंदरीत, शिवरायांच्या जयंतीनिमित्त अमरावती जिल्ह्यात उत्साह, परंपरा आणि शौर्याची उजळणी करत जल्लोषात उत्सव साजरा करण्यात आला.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. या निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमानंतर शिवटेकडी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याला मा.महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे हस्ते हारार्पण करण्यात आले.

# परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही चित्रीकरण जतन बंधनकारक; नियमभंगास कठोर कारवाई

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**




राज्यातील इयत्ता १० वी व १२ वीच्या सार्वजनिक परीक्षांदरम्यान पारदर्शकता राखण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही चित्रीकरण जतन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून याबाबत कडक आदेश जारी करण्यात आले असून नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.परीक्षा प्रक्रियेदरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षमपणे कार्यान्वित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान ३० मिनिटे तसेच परीक्षा संपल्यानंतरही काही काळ सातत्याने चित्रीकरण करणे बंधनकारक राहील. सर्व कॅमेरे 'सतत चित्रीकरण'पद्धतीवर ठेवावेत; हालचाल आधारित रेकॉर्डिंगला मनाई करण्यात आली आहे.प्रत्येक केंद्रावर डिजिटल व्हिडिओ रेकॉर्डर किंवा नेटवर्क व्हिडिओ रेकॉर्डर प्रणालीसह किमान १ टीबी क्षमतेची हार्डडिस्क असणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार बॅकअपसाठी अतिरिक्त हार्डडिस्कची साठवणूक व्यवस्था ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हा दक्षता समिती किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास सीसीटीव्ही फुटेज तात्काळ उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.वीजपुरवठा खंडित झाल्यासही चित्रीकरण सुरू राहावे यासाठी सीसीटीव्ही प्रणाली यूपीएस किंवा इन्व्हर्टरशी जोडणे आवश्यक आहे. किमान दोन तास अखंड रेकॉर्डिंग सुरू राहील, याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच इंटरनेट सुविधा सुरक्षित व स्थिर ठेवणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.परीक्षा कक्ष, प्रवेशद्वार, कॉरिडॉर व नियंत्रण कक्षात दिनांक व वेळ दर्शविणारे, कमी प्रकाशातही स्पष्ट चित्रीकरण करणारे कॅमेरे बसविणे बंधनकारक आहे. कॅमेऱ्यांची मांडणी छेडछाड होणार नाही, अशा पद्धतीने करावी. परीक्षेपूर्वी सर्व कॅमेरे कार्यरत असल्याची खात्री करून थेट निरीक्षणाची सुविधा उपलब्ध ठेवावी.सीसीटीव्ही बंद ठेवणे, फुटेज जतन न करणे किंवा निरीक्षणासाठी प्रवेश न देणे ही गंभीर बाब मानली जाणार आहे. अशा प्रकरणांत संबंधित प्राचार्य, केंद्रसंचालक व केंद्र समन्वयक यांच्यावर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे.

# एम डी ड्रग्स विक्री करणाऱ्या इसमावर गुन्हेशाखेची धडक कारवाई

## २ लाखांचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

शहरात अवैधरित्या अंमली पदार्थांची विक्री व वाहतूक करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त यांनी दिल्यानंतर अमरावती शहर गुन्हेशाखेने मोठी कारवाई केली आहे. मॅफेड्रॉन (एम.डी.) ड्रग्स विक्रीच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका इसमाला अटक करून सुमारे दोन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हेशाखेच्या पथकाने आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार सापळा रचला. आदर्श हॉटेल ते चौधरी चौक दरम्यान संशयित इसमाला अडविण्यात आले. सैयद नाझिम सैयद कासीम (वय ३५, रा. पटवा चौक, मंसानगंज, अमरावती) याला त्याच्या मोपेडसह ताब्यात घेण्यात आले.त्याच्या ताब्यातून ११.३९० ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.) ड्रग्स पावडर किंमत अंदाजे १,११,९०० रुपये, गुन्ह्यात वापरलेली होन्डा डिओ मोपेड (क्र. एमएच-२७-सीई-७८१३) किंमत अंदाजे ८०,००० रुपये तसेच एक आय क्यू कंपनीचा मोबाईल किंमत १०,००० रुपये असा एकूण २,०१,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी आरोपीविरुद्ध सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ५९/२०२६ अन्वये कलम ८ (क), २१ (ब), २२ (ब), २९ एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.शहरातील अंमली पदार्थांविरोधातील ही कारवाई पोलिसांकडून सातत्याने सुरू राहणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.सदरची कार्यवाहीपोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार पोहेकॉ सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, जहीर शेख, सचिन बहाळे, नापोका अतुल संभे, पोकॉ सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, चेतन कराळे, योगेश पवार, (फोटोग्राफर) सुधिर गुडधे, (चालक) राजेश मेढे यांनी केली आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# शिवरायांचे स्वराज्य सर्वांसाठी प्रेरणादायी सभापती हरीशभाऊ मोरे यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**



कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बाजार समितीच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती हरीशभाऊ मोरे होते. उपसभापती भैय्यासाहेब निर्मळ, संचालक नानाभाऊ नागमोते, प्रकाशराव काळबांडे, प्रमोदभाऊ इंगोले, प्रकाशराव कोकाटे, सचिव दीपक विजयकर, सहाय्यक सचिव बी. डोईफोडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले. सभापती हरीशभाऊ मोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तसेच दूरदर्शी आणि महान पुरुष होते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शून्यातून स्वराज्याची निर्मिती केली. त्यांचे ध्येय, पराक्रम आणि लोककल्याणकारी राज्यकारभार आजही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.कार्यक्रमात शिवरायांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले. उपस्थितांनी शिवरायांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श अंगीकारावा- प्रविण पोटे पाटील

## शिवजयंती निमित्त प्रविण पोटे पाटील यांचा मिरवणुकीत सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज माजी राज्यमंत्री श्री प्रविण पोटे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून राजांना त्रिवार वंदन करत मानाचा मुजरा केला.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी शिवगर्जना देत वातावरण शिवमय केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा व पराक्रमाचा गौरव करत त्यांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांनी व समाजाने अंगीकारावा, असे आवाहन यावेळी प्रविण पोटे पाटील यांच्या वतीने करण्यात आले.

त्यानंतर श्री प्रविण पोटे पाटील यांनी पी . आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात, भगव्या पताकांच्या साक्षीने आणि पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, नागरिक व शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शिवजयंती निमित्त अमरावतीत भव्य मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आयोजन; शेकडो स्पर्धकांचा सहभाग




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती वर्षानिमित्त आज १९ फेब्रुवारी रोजी आयोजित विदर्भस्तरीत 'शिवदौड' मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित या स्पर्धेत विविध वयोगटातील शेकडो स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला कार्यक्रमाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, उद्घाटक डॉ. मिलिंद बारहाते, महापौर श्रीचंद तेजवानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.स्पर्धेची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रांगणातून होऊन समारोपही तेथेच करण्यात आला. १९ वर्षांआतील व १४ वर्षांआतील मुले-मुली, तसेच ४५ वर्षांवरील पुरुष व ४० वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले होते. १० कि.मी., ५ कि.मी. आणि ३ कि.मी. अशा अंतरांच्या शर्यती पार पडल्या.सकाळी ८ वाजता बक्षीस वितरण सोहळा झाला. प्रथम ते सहाव्या क्रमांकापर्यंतच्या विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात आले. सर्व सहभागी स्पर्धकांना टी-शर्ट, सहभाग प्रमाणपत्र व अल्पोपहार देण्यात आला.मान्यवरांनी युवकांनी क्रीडा, शिस्त व आरोग्य यांचे महत्त्व ओळखून प्रेरणादायी जीवन जगावे, असे आवाहन केले. आयोजन समितीने यशस्वी व्यवस्थापनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# भूमी अभिलेख विभाग कार्यालयात कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अमरावती**

आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आज अमरावती येथील भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांनी आंदोलन छेडले. 'समान काम, समान वेतन' या प्रमुख मागणीसह विविध १७ मागण्यांच्या पूर्ततेसाठी कर्मचाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

सकाळपासूनच कर्मचारी कार्यालय परिसरात एकत्र जमले होते. हातात फलक, काळ्या फिती लावून त्यांनी शासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. 'आता नाही तर कधीच नाही', 'समान काम, समान वेतन लागू करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की 'भुकरमापक' पदासाठी अभियांत्रिकी पदवी किंवा पदविका आवश्यक असतानाही तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. इतर विभागांमध्ये समान पदांना तांत्रिक वेतनश्रेणी देण्यात येत असताना भूमी अभिलेख विभागाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला.

या आंदोलनामुळे जमिनीची हद्द मोजणी, न्यायालयीन मोजण्या, सिटी सर्व्हे तसेच विविध शासकीय प्रकल्पांसाठी आवश्यक भूसंपादन मोजणीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# सुशासन व स्वराज्याची ज्योत सदैव तेवत ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकप्रशासनाची गरज - आ.सौ. सुलभाताई खोडके

## शिवजयंती निमित्य शिवटेकडीवर रयतेच्या राजाला आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांची मानवंदना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**




रयतेचे थोर कल्याणकारी राजे , हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी शिवजयंती दिनी आज गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई खोडके व आ. संजय खोडके यांनी शिवटेकडी स्थित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला मानवंदना अर्पण केली. तसेच आमदार महोदयांनी सर्व शिवभक्तांना शिवाजी महाराज जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. शिवजयंती निमित्य शिवटेकडी सजली असल्याने त्या ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असता आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी कार्यक्रमात सहभागी होऊन शिवप्रेमींचा आनंद द्विगुणित केला. तसेच शिवटेकडी येथे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती व अमरावती महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजयंती व्याख्यान कार्यक्रमाला सुद्धा आ.सौ.सुलभाताई खोडके व आ.संजय खोडके यांची उपस्थिती होती.शिवजयंती निमित्य शिवटेकडीवर उपस्थित शिवप्रेमींना शुभेच्छा देतांना आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी सांगितले कि, छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आणि कार्य समतावादी व न्यायपूर्ण समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक स्वरूपाचे आहे. शिवराज्यातील अर्थ व्यवस्था, धर्मनिरपेक्ष धोरण, स्त्री-पुरुष समानता , शेती विकासाचे धोरण महत्वाचे असून प्रजा हित व रयतेचे कल्याण साधण्याकरिता महाराजांच्या काळातील राज्यकारभार हेच खरे सुशासन आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे अनुसरण करून सर्वांनी सुशासन व स्वराज्याची ज्योत सदैव तेवत ठेवण्यासाठी नवा संकल्प व नवीन जाणीव निर्माण करण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले. यावेळी महिलांचा पारंपरिक पेहराव, बालकांच्या विविध वेशभूषा सुद्धा लक्षवेधी ठरल्या. यावेळी शिवटेकडीवर रयतेच्या राजाला मानवंदना अर्पण करण्यासाठी शिवप्रेमींची बहुसंख्येने उपस्थिती होती. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज कि जय... जय भवानी, जय शिवाजी, तुमचं आमचं नातं काय.. जय जिजाऊ जय शिवराय.. अशा गगनभेदी घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत